SONI TILES Since 1965
AND MARBLE INDUSTRIES
Opp. Munot Estate, Station Road, Ahmednagar. Tel. : (0241) 2418720
Mob. 9372497999
Wholesalers & Manufacturers of - Ceramic Wall & Floor Tiles, Vitrified Tiles, Paving Blocks, Marble & Granite
सोनी टाईल्स अँण्ड मार्बल इंडस्ट्रिज

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

साऊथ इंडियन/पावभाजी/पंजाबी डिशेस/ छोले भटूरे/पावभाजी/मिल्कशेक
नगरकर खवय्यांच्या पसंतीस उतरलेला साऊथ इंडियन
Sambar
PURE - VEG | Aromas of South !
Restaurant Timing 8 AM to 11 PM
एल.जी.शोरूम समोर, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर. मो.- 85306 40202
पार्सल सुविधा उपलब्ध..

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, बुधवार दि. ०८.०४.२०२६ | अंक नं. ००७ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020

स्वप्नवत ऑफर... स्वप्नवत सफर...
१०१ भाग्यवंत जोडप्यांना चक्क FREE हनिमून टूर
1 डिसेंबर 2025 ते 31 मे 2026
बस्ता बांधायला यायचं हं!
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
संगमनेर (02425) 222226
अहिल्यानगर (0241) 2999299
नारायणगाव (02132) 242132
श्रीरामपूर (02422) 220090

22 कॅरेट सोन्याचा
सर्वात कमी भाव, सर्वात कमी मजुरी.
दागिन्यांची प्रतीग्रॅम मजुरी ₹888/-
Conditions Apply*
चंदुकाका ज्वेल्स™
शॉप नंबर 2/3, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर 9272422001/02

## भारतीय शेअर बाजार सेन्सेक्स २६०० तर निफ्टी निर्देशांक ८०० अंकांनी वधारला

मुंबई – भारतीय शेअर बाजाराचे प्रमुख निर्देशांक बीएसई सेन्सेक्स आणि निफ्टी ५० हे दोन्हीही ८ एप्रिल रोजी तेजीसह उघडले. डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणसोबत दोन आठवड्यांच्या युद्धविरामाची घोषणा केल्यानंतर जागतिक स्तरावर मिळालेल्या सकारात्मक संकेतांमुळे सेन्सेक्स २६०० अंकांनी तर निफ्टी निर्देशांक ८०० अंकांनी उसळून २३,८०० च्या पातळीवर व्यवहार करत होता. या घोषणेमुळे कच्च्या तेलाच्या किमतींम ध्येही मोठी घसरण झाली आहे.

बाजार सुरु होताच सेन्सेक्स २,५९६.०३ अंशांनी (किंवा ३.४८ टक्क्यांनी) वधारून ७७,२१२.६१ च्या पातळीवर पोहोचला, तर निफ्टी ७६७.२५ अंशांनी (किंवा ३.३२ टक्क्यांनी) वधारून २३,८९०.९० च्या पातळीवर व्यवहार करत आहे. या व्यवहारादरम्यान, सुमारे २५३४ शेअर्समध्ये वाढ झाली, १६६ शेअर्समध्ये घसरण झाली आणि ८२ शेअर्सचे भाव स्थिर राहिले.

निफ्टी मधील सर्वाधिक नफा कमावणाऱ्या शेअर्समध्ये इंटरग्लोब एव्हिएशन, एल अँण्ड टी, श्रीराम फायनान्स, अदाणी पोर्ट्स आणि अदाणी एंटरप्रायजेस यांचा समावेश होता. तर ओएनजीसी, कोल इंडिया आणि टेक महिंद्रा हे शेअर्स सर्वाधिक घसरण नोंदवणारे ठरले.

सकाळी १० वाजता सेन्सेक्स २,७०१.२६ अंकांनी (किंवा ३.६२ टक्क्यांनी) वधारून ७७,३१७.८४ वर पोहोचला, तर निफ्टी ७८६.५० अंकांनी (किंवा ३.४० टक्क्यांनी) वधारून २३,९१०.१५ वर व्यवहार करत होता. सुमारे ३,३५९ शेअर्समध्ये वाढ झाली, २९५ शेअर्समध्ये घसरण झाली आणि १०० शेअर्समध्ये कोणताही बदल झाला नाही.

सकाळी ११ वाजता सेन्सेक्स २,९०१.४३ अंकांनी (किंवा ३.८९ टक्क्यांनी) वधारून ७७,५१८.०१ वर पोहोचला, तर निफ्टी ८६०.४० अंकांनी (किंवा ३.७२ टक्क्यांनी) वधारून २३,९८४.०५ वर व्यवहार करत होता. सुमारे ३,५११ शेअर्समध्ये वाढ झाली, ३३८ शेअर्समध्ये घसरण झाली आणि ९३ शेअर्समध्ये कोणताही बदल झाला नाही.

दुपारी १२ वाजता सेन्सेक्स २,८४२.०८ अंकांनी (किंवा ३.८१ टक्क्यांनी) वधारून ७७,४५८.६६ वर पोहोचला, तर निफ्टी ८३९.८० अंकांनी (किंवा ३.६३ टक्क्यांनी) वधारून २३,९६३.४५ वर व्यवहार करत होता. सुमारे ३,५६९ शेअर्समध्ये वाढ झाली, ३९२ शेअर्समध्ये घसरण झाली आणि ९२ शेअर्समध्ये कोणताही बदल झाला नाही.

दुपारी १ वाजता सेन्सेक्स २,८५५.१३ अंकांनी (किंवा ३.८३ टक्क्यांनी) वधारून ७७,४७१.७१ वर पोहोचला, तर निफ्टी ८५४.४० अंकांनी (किंवा ३.६९ टक्क्यांनी) वधारून २३,९७८.०५ वर व्यवहार करत होता. सुमारे ३,५९६ शेअर्समध्ये वाढ झाली, ३९१ शेअर्समध्ये घसरण झाली आणि ९९ शेअर्समध्ये कोणताही बदल झाला नाही.

### गुंतवणूकदारांच्या संपत्तीत १४ लाख कोटी रुपयांची वाढ

बाजारातील या तेजीमुळे बीएसईवर सूचीबद्ध असलेल्या कंपन्यांचे एकूण बाजार भांडवल मागील सत्रातील ४२९ लाख कोटी रुपयांवरून वाढून ४४३ लाख कोटी रुपयांवर पोहोचले. ज्यामुळे अवघ्या काही मिनिटांतच गुंतवणूकदारांच्या संपत्तीत १४ लाख कोटी रुपयांची वाढ झाली.

स्वतंत्र इमारत भाड्याने देणे
सावेडी, परिचय हॉटेलमागे, बालिकाश्रम रोड येथे ऑफिस, बँक, फायनान्स ऑफिस, ओपीडी, इ.साठी उपयुक्त.
(प्रशस्त पार्किंग व लिफ्टची सुविधा असलेली रेडी पझेशन इमारत)
8888347411

Educating Students for a better & bright Future
Jivan Jyot English Medium School & Junior College
ADMISSION OPEN FOR 2026-27
PLAY GROUP / NURSERY
L.K.G / U.K.G
1st Std. to 12th Std.
Opp. Bombay Bakers, Behind Forest Office, Nagar-Ch. Sambhajinagar Road, Ahilyanagar
For More Details Contact
Mo. 8830685732 / 9637388388
Website : www.jjmf.info

## पथदिव्यांचे खांब उभे, दिवे गायब



नगर – शहरातील महावीरनगर परिसरात पथदिव्यांचे खांब उभारण्याचे काम काही महिन्यांपूर्वी पूर्ण झाले असले, तरी त्या खांबांवर अद्याप दिवे बसविण्यात आलेले नसल्याने परिसरात रात्रीच्या वेळी अंधाराचे साम्राज्य पसरले आहे. यामुळे नागरिकांना विविध अडचणींना साम रे जावे लागत असून सुरक्षिततेचा प्रश्नही निर्माण झाला आहे.

महावीरनगरमधील मुख्य रस्ते तसेच अंतर्गत गल्ल्यांमध्येही पुरेशा प्रकाशाची व्यवस्था नसल्याने पादचारी, महिला, ज्येष्ठ नागरिक आणि वाहनचालकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. विशेषतः शाळा व महाविद्यालयातून घरी परतणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी अंधारामुळे अपघात अथवा अनुचित प्रकार घडण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, पथदिव्यांचे खांब उभारल्यानंतर प्रशासनाने पुढील कामाकडे दुर्लक्ष केले आहे. खांब उभे करून काम पूर्ण झाल्याचे दाखवले जात आहे; मात्र दिवे नसल्यामुळे त्याचा कोणताही उपयोग होत नाही, अशी प्रतिक्रिया नागरिकांकडून व्यक्त करण्यात आली.

या संदर्भात अविनाश देडगावकर यांनी प्रशासनाचे लक्ष वेधले असून, संबंधित विभागाने तातडीने पथदिवे बसवून ते कार्यान्वित करावेत, अशी मागणी केली आहे. महावीरनगरसारख्या वाढत्या वस्तीच्या भागात मूलभूत सुविधांकडे दुर्लक्ष करणे योग्य नाही. नागरिकांच्या सुरक्षेसाठी पथदिवे त्वरित सुरू करणे आवश्यक आहे, असे त्यांनी सांगितले. दरम्यान, महावीरनगरमधील नागरिकांनी लवकरात लवकर उपाययोजना न झाल्यास आंदोलन छेडण्याचा इशाराही दिला आहे. संबंधित प्रशासनाने या समस्येकडे गांभीर्याने लक्ष देऊन तातडीने कार्यवाही करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

## माऊली संधिवात क्लिनिक, अहिल्यानगर तर्फे मोफत मार्गदर्शन व तपासणी शिबिर



डॉ. विद्या अभिजित सांगळे-बांगर

संधिवात झाल्यास घाबरून जाऊ नये. लक्षणे असल्यास संधिवात तज्ज्ञांचा सल्ला घेणे आवश्यक असते. वेळेत उपचार हीच संधिवात लवकर बरा होण्याची गुरुकिल्ली आहे, असे मार्गदर्शन अहिल्यानगर येथील माऊली संधिवात क्लिनिकच्या संचालक डॉ. विद्या बांगर-सांगळे यांनी केले.

जामखेड नगर परिषदेचे माजी नगरसेवक व भाजपा नेते अमितभाऊ चिंतामणी यांच्या वाढदिवसानिमित्त बांधकाम समितीचे सभापती मोहन पवार यांच्या वतीने तसेच अहिल्यानगरच्या माऊली संधिवात क्लिनिकच्या माध्यमातून आयोजित नुकतेच जामखेडमध्ये मोफत संधिवात व मधुमेह तपासणी शिबिर झाले. या वेळी त्या बोलत होत्या. शिबिरात १५५ रुग्णांनी लाभ घेतला. शिबिराचे उद्घाटन भाजपाचे ज्येष्ठ नेते प्रा. मधुकर राळेभात यांच्या हस्ते झाले. या वेळी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती शरद कार्ले, माजी नगरसेवक अमित चिंतामणी, उपनगराध्यक्ष पोपट राळेभात, तात्याराम पोकळे, नगरसेवक प्रवीण सानप तसेच मान्यवर उपस्थित होते. शिबिरात सुप्रसिद्ध संधिवात तज्ज्ञ डॉ. विद्या अभिजित सांगळे-बांगर (सल्लागार संधिवातशास्त्रज्ञ आणि रोगप्रतिकारशास्त्रज्ञ, एमबीबीएस, डीएनबी, संधिवातशास्त्रातील डॉक्टोरल फेलोशिप, सीएमसी, वेल्लोर) व सुप्रसिद्ध मधुमेह तज्ज्ञ डॉ. ज्योत्स्ना जाजु-भराडीया (मधुमेह, आहार आणि लठ्ठपणा विशेषज्ञ, एमबीबीएस, एमडी, डायबेटिस मेलिटस फेलोशिप, यूके) या तज्ज्ञांनी संधिवात व मधुमेह या आजारांची तपासणी व मार्गदर्शन केले.

**माऊली संधिवात क्लिनिक, येथे संपर्क करावा**

सांध्यांमधील वेदना, सूज, कडकपणा, थकवा, सांध्यांतून आवाज येणे, वजन कमी होणे, अशी लक्षणे आढळल्यास अहिल्यानगरच्या माऊली संधिवात क्लिनिक (मोबा. ७०२८६५२०७०) येथे संपर्क साधावा, असे आवाहन या वेळी करण्यात आले.



खुशखबर.. खुशखबर.. खुशखबर..
उदय ट्रॅव्हल्स् सुरु करित आहे अहिल्यानगरकरांसाठी खास
सोमवार दि. १३/४/२०२६ पासुन
डेली अहिल्यानगर-पुणे-अहिल्यानगर
आपल्या आग्रहास्तव दररोज पहाटे ५.३० वा.
पुणे व खास मुंबईकडे जाणाऱ्या प्रवासी मित्रांकरिता
आपल्या सेवेत 2 x 2 बसद्वारे सुरु करित आहोत.
अहिल्यानगर–पुणे–वाकडेवाडी–सांगवी–डांगे चौक–वाकड–भुमकर चौक
दुपारी ४.०० वाजता भुमकर चौक–डांगे चौक–सांगवी–वाकडेवाडी–अहिल्यानगर
बिनाथांबा आरामशीर प्रवास
वेळेत सुरक्षित प्रवास । सुशिक्षित नम्र स्टाफ
– अधिक माहिती व बुकिंगसाठी संपर्क –
उदय ट्रॅव्हल्स्
मो. 9890800123 / 9890066580
www.udaytravel.com

लूट लो ऑफर
फक्त पुरुषांसाठी शर्ट, टि-शर्ट, लोवर या पैकी काहिही ३ घ्या फक्त रु.५००/- मध्ये
फॉरमल पॅन्टस्, जीन्स Rs.300/- पासुन पुढे
हाप व फुल जेन्टस् ब्राकसेट Rs.300/- मध्ये उपलब्ध
7XL पर्यंत
फक्त पुरुषांसाठी जेन्टस् शर्ट, नाईट पॅन्ट, टि शर्ट, ट्राऊझर Rs.200/- पासुन पुढे
कार्गो पॅन्ट Rs.250/-
लेडिज व जेन्टस् वॉचेस (घड्याळ) Rs.100/-
जिन्स व फॉर्मल पॅन्ट ४४ साईज पर्यंत व कॉटन पॅन्ट ३८ साईज पर्यंत उपलब्ध
तसेच डिझायन, चेक्सचे शर्ट व व्हाईट शर्ट
7XL साईज पर्यंत उपलब्ध
अहिल्यानगर शहरातील भव्य मॉल पुरुषांसाठी सर्व काही
शुभ मॉल
मयुरी लेडिज मॉलच्या वर
वेळ- दुपारी १२ ते सायंकाळी ७ पर्यंत
मल्हार चौक, आयकॉन पब्लिक स्कूल जवळ, आगरकर मळा, अ.नगर 9028201188
Terms & Conditions Apply.


संस्मरण
जिवनात शब्दांची ओळख करुन चांगले विचार देणारा
भक्ती शिकवणारा, लढण्यासाठी शक्ती देणारा
हात तुमच्या मायेचा, असुद्या मस्तकावरी
कै. लोकुमल मेंघानी
स्व. दि. ८ एप्रिल १९९९
आपल्या स्मरणदिनानिमित्त सुमनांजली..
मेंघानी परिवार, अहिल्यानगर
राम एजन्सी

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
फोन-२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

# इंस्टाग्रामवर बनावट खात्याद्वारे तरुणाची बदनामी; गुन्हा दाखल

नगर – सोशल मीडियाचा गैरवापर करून सर्वसामान्यांना त्रास देण्याच्या घटनांमध्ये वाढ होत असून, नगर शहरात एका तरुणाच्या नावाने बनावट इंस्टाग्राम खाते उघडून त्याची बदनामी केल्याचा प्रकार समोर आला आहे. याप्रकरणी रमेश भागचंद शिंदे यांनी दिलेल्या तक्रारीवरून सायबर पोलीस ठाण्यात अज्ञात खातेधारकाविरुद्ध गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

फिर्यादी रमेश शिंदे हे खासगी नोकरी करतात, २७ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी सव्वा दहा वाजेच्या सुमारास एका अज्ञात व्यक्तीने त्यांच्या परवानगीशिवाय त्यांच्या नावाचा आणि फोटोचा वापर करून '24 shinde 7901630' या नावाने बनावट इंस्टाग्राम खाते तयार केले. या खात्याद्वारे फिर्यादीची समाजात बदनामी करण्याचा प्रयत्न करण्यात आला. ही बाब लक्षात येताच रमेश शिंदे यांनी सायबर पोलिसांकडे धाव घेतली.

या प्रकरणाचा तपास पोलीस निरीक्षक सागर ढिकले यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस नाईक निळकंठ कारखेले करत आहेत. फिर्यादीने आज तक्रार दिल्याने या गुन्ह्याची नोंद करण्यात आली असून, तांत्रिक माहितीच्या आधारे बनावट खाते चालवणाऱ्या आरोपीचा शोध सुरू आहे. नागरिकांनी आपली वैयक्तिक माहिती आणि छायाचित्रे सोशल मीडियावर ठेवताना काळजी घ्यावी, असे आवाहन सायबर पोलिसांनी केले आहे.

# एस टी बस प्रवासात महिलेच्या १२.८५ लाखांच्या दागिन्यांची चोरी

नगर – पुणे ते पाथर्डी प्रवासादरम्यान एसटी बसमधील गर्दीचा फायदा घेऊन एका अज्ञात महिला चोरट्याने प्रवासी महिलेच्या बॅगेतून सुमारे १२ लाख ८५ हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत मिनाबाई ज्ञानदेव बडाख (वय ५७, रा. करजगाव, ता.नेवासा) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी या ७ एप्रिल रोजी पुणे ते पाथर्डी जाणाऱ्या एसटी बस ने पुणे ते अहिल्यानगर असा प्रवास करत होत्या. प्रवासादरम्यान त्यांनी आपले सोन्याचे दागिने एका बॅगेत सुरक्षित ठेवले होते. मात्र, सकाळी १०:३० ते दुपारी २ वाजेच्या सुमारास बसमध्ये असलेल्या एका अज्ञात महिला चोरट्याने नजर चुकवून बॅगेतील दागिने लंपास केले. यामध्ये अडीच तोळ्याच्या बांगड्या, चार तोळ्याचे दोन मोठे गंठण, मिनी गंठण, कानातील झुबे, टॉप्स, सोन्याच्या सहा अंगठ्या आणि चैन असा एकूण १८ तोळ्यांहून अधिकचा ऐवज चोरीला गेला आहे.

चोरी झाल्याचे लक्षात येताच फिर्यादीने कोतवाली पोलीस ठाण्यात धाव घेऊन तक्रार दिली. पोलिसांनी याप्रकरणी अज्ञात महिलेविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम ३०३(२) नुसार गुन्हा नोंदवला आहे. पोलीस निरीक्षक संभाजी गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस पथक अधिक तपास करत असून, बसमधील सीसीटीव्ही चित्रण आणि संशयित महिलांचा शोध घेतला जात आहे. प्रवाशांनी प्रवासादरम्यान आपल्या मौल्यवान वस्तूंची काळजी घ्यावी, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.

# 'राहुरी'तील भाजप उमेदवार अक्षय कर्डिले यांची ७.८० कोटींची मालमत्ता तर अविभक्त कुटुंबाच्या नावावर १६ कोटी ३५ लाखांची जंगम व स्थावर मालमत्ता

नगर – राहुरी विधानसभेच्या पोटनिवडणुकीतील भाजपचे उमेदवार अक्षय शिवाजी कर्डिले यांची जंगम व स्थावर अशी एकत्रित मालमत्ता ७ कोटी ८० लाख ७६ हजार १४२ रुपये, त्यांची पत्नी प्रियंका अक्षय कर्डिले यांच्या नावावर १ कोटी ६४ लाख ३८ हजार ६१७ रु.ची मालमत्ता आहे तर कर्डिले हिंदू अविभक्त कुटुंबाच्या नावावर जंगम व स्थावर अशी एकूण मालमत्ता १६ कोटी ३५ लाख ११ हजार ६५९ रुपयांची असल्याचे उमेदवारी अर्जासोबत जोडलेल्या प्रतिज्ञापत्रात नमूद केले आहे.

उमेदवार अक्षय कर्डिले प्रथमच निवडणुकीच्या रिंगणात उतरले आहेत. राहुरी मतदारसंघातील दिवंगत आमदार शिवाजी कर्डिले यांचे ते चिरंजीव आहेत. भाजपने त्यांना अक्षय कर्डिले यांना उमेदवारी दिली आहे. प्रमुख प्रतिस्पर्धी माजी आमदार प्राजक्त तनपुरे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संपर्कानंतर निवडणूक न लढवण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे भाजपचे उमेदवार कर्डिले यांच्या विरोधातील निवडणुकीतील चुरस जवळपास संपुष्टात आली आहे.



उमेदवार कर्डिले यांनी आपल्या प्रतिज्ञापत्रामध्ये जंगम मालमत्तेमध्ये स्वतः कडे १८ लाख २६ हजार ११४ रुपये रोख रक्कम, २ कोटी २७ लाख ५७ हजार ३८७ रुपये बँक खात्यामध्ये रक्कम तर त्यांची पत्नी प्रियंका कर्डिले यांच्याकडे स्वतःची ६ लाख १२ हजार ९ रुपये रोख रक्कम असून १ कोटी ६४ लाख ३८ हजार ६१७ रुपये बँक खात्यामधील रक्कम आहे. कर्डिले यांची स्थावर मालमत्ता ही ५ कोटी ५३ लाख १८ हजार ७५५ रुपये आहे. त्यांच्या पत्नीच्या नावावर स्थावर मालमत्ता नाही. मात्र हिंदू अविभक्त कुटुंबाकडे १९ लाख ११ हजार ९२६, जंगम तर १६ कोटी १५ लाख ९९ हजार ८३३ रूपयांची स्थावर मालमत्ता आहे.

त्याचबरोबर कर्डिले यांच्या नावावर दोन पेट्रोल पंप असून फोर्ड इंडीवर, टोयाटो फॉर्च्यूनर, बुलेट, ट्रॅक्टर, प्लेजर व मोटरसायकल अशी एकूण सहा वाहने आहेत. तर पत्नीच्या नावावर अंजना वाईन टॅक्स हे दुकान आहे. कर्डिले यांच्या नावावर मर्चन्टस् बँकेचे ३ कोटी १५ लाख ४४ हजार ५२३ रुपये, तर हिंगणगाव सोसायटीचे ७ लाख ९९ हजार ८२९ व स्टेट बँकेचे १४ लाख ९३ हजार १३३ रुपयांचे कर्ज आहे. अक्षय कर्डिले यांनी उत्पन्नाच्या स्त्रोतामध्ये शेती, दुध व्यवसाय व हॉटेल व्यवसाय असल्याचे प्रतिज्ञापत्रात नमुद केले आहे तर पत्नीच्या उत्पन्नाचा स्त्रोतामध्ये शेती, दुध व वाईन व्यवसाय असल्याचे नमूद केले आहे.

# दोन सत्रातील साफसफाई निर्णयाविरोधात महापालिकेचे कर्मचारी ९ एप्रिलपासून करणार बेमुदत धरणे आंदोलन

## उन्हाळ्यात दुपारच्या कामामुळे जीवितास धोका – युनियनचा गंभीर आक्षेप

नगर – महानगरपालिका प्रशासनाने शहरातील दैनंदिन साफसफाईचे काम दोन सत्रांमध्ये करण्याचा घेतलेला निर्णय मनपा कर्मचारी युनियनने धुडकावून लावला असून, एकाच सत्रात कामकाज सुरू ठेवण्याची मागणी करत आयुक्तांना निवेदन सादर करण्यात आले आहे. यासंदर्भात तातडीने सकारात्मक निर्णय न झाल्यास ९ एप्रिलपासून आरोग्य विभागातील सर्व सफाई कर्मचारी बेमुदत धरणे आंदोलन छेडणार असल्याचा इशारा युनियनने अध्यक्ष जितेंद्र सारसर व सचिव आनंद वायकर यांनी निवेदनाद्वारे आयुक्त यशवंत डांगे यांना दिला आहे.



आनंद वायकर



जितेंद्र सारसर

महानगरपालिका प्रशासनाने १ एप्रिल २०२६ पासून शहरातील साफसफाईचे कामकाज दोन सत्रांमध्ये – सकाळी ६ ते १० व दुपारी ३ ते सायंकाळी ७ या वेळेत करण्याचे आदेश दिले आहेत. मात्र, युनियनच्या मते हा निर्णय प्रत्यक्ष परिस्थितीला धरून नसून कामगारांसाठी अत्यंत गैरसोयीचा आहे. अनेक वर्षांपासून एकाच सत्रात साफसफाईचे काम सुरळीत सुरू असताना अचानक दोन सत्रांचा निर्णय घेणे अयोग्य असल्याचे त्यांनी नमूद केले आहे.

युनियनचे सरचिटणीस कॉ. आनंदराव वायकर यांनी निवेदनात म्हटले आहे की, बहुतांश सफाई कामगारांना पहाटे ५ वाजताच घरातून निघावे लागते. वाहतूक सुविधेअभावी अनेकांना पायीच हजेरीवर यावे लागते. एका फेरीसाठी सुमारे एक तासाचा प्रवास करावा लागतो. अशा परिस्थितीत सकाळी काम करून पुन्हा दुपारी हजेरी लावणे कामगारांसाठी अत्यंत कष्टदायक ठरत आहे.

याशिवाय सध्या उन्हाळ्याची तीव्रता वाढली असून दुपारच्या वेळेत प्रचंड उष्णतेचा तडाखा जाणवतो. दुपारी १२ नंतर नागरिकही घराबाहेर पडत नाहीत, अशा वेळी सफाई कर्मचाऱ्यांकडून काम करून घेणे त्यांच्या आरोग्यास घातक ठरू शकते. उष्माघाताचा धोका निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नसल्याने प्रशासनाचा निर्णय हा कामगारांच्या जीविताशी खेळ करणारा असल्याचा गंभीर आरोप युनियनने केला आहे.

दरम्यान, यापूर्वी युनियनच्या शिष्टमंडळाने वरिष्ठ अधिकाऱ्यांशी चर्चा करून अडचणी मांडल्या होत्या. उपायुक्त (कर) व अतिरिक्त आयुक्त यांच्या उपस्थितीत बैठक घेऊन लवकरच निर्णय घेण्याचे आश्वासन देण्यात आले होते. मात्र, अद्याप कोणताही अंतिम निर्णय न झाल्याने कामगारांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे.

महापालिका प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करून एकाच सत्रात साफसफाईचे कामकाज सुरू ठेवण्याचा निर्णय घ्यावा, अन्यथा ९ एप्रिलपासून बेमुदत धरणे आंदोलन करण्यात येईल आणि त्यातून उद्भवणाऱ्या परिणामांना सर्वस्वी प्रशासन जबाबदार राहील, असा इशारा कर्मचारी युनियनकडून देण्यात आला आहे.

# खाजगी व्हिडीओ व्हायरल करण्याची धमकी देत डॉक्टर तरुणीकडे दोन लाखांच्या खंडणीची मागणी

नगर – नोकरीसाठी अर्ज देण्यास आलेल्या एका डॉक्टर तरुणीचा पाठलाग करून, तिचे व तिच्या बहिणीचे खाजगी व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल करण्याची धमकी देत दोन लाख रुपयांची खंडणी मागणाऱ्या एका वकिलाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हर्षद चावला असे गुन्हा दाखल झालेल्या संशयित आरोपीचे नाव आहे. याबाबत एका राजकीय पक्षाच्या पदाधिकाऱ्याच्या मुलीने तोफखाना पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पीडित डॉक्टर तरुणी ६ एप्रिल रोजी सकाळी ११.४५ च्या सुमारास सिव्हील हॉस्पिटल येथील सिव्हील सर्जन कार्यालयासमोर दुचाकी पार्किंगमध्ये नोकरीचा अर्ज देण्यासाठी आली होती. यावेळी आरोपी हर्षद चावला याने तिचा पाठलाग केला. पीडितेने विचारणा केली असता, त्याने आपण वकील असल्याचे सांगून राजकीय संबंधांचा बनाव रचला. पीडितेचे आणि तिच्या डॉक्टर बहिणीचे खाजगी व्हिडिओ आपल्याकडे असल्याचे सांगून ते सार्वजनिक करण्याची धमकी त्याने दिली.

या व्हिडिओच्या बदल्यात आरोपीने दोन लाख रुपयांची मागणी केली. पैसे न दिल्यास संपूर्ण कुटुंबाची बदनामी करण्याची आणि दोन्ही बहिणींचे वैद्यकीय क्षेत्रातील करिअर संपवून टाकण्याची धमकी त्याने दिली. वारंवार पाठलाग करून लज्जास्पद वर्तन केल्याप्रकरणी पीडितेने दिलेल्या फिर्यादीवरून पोलिसांनी हर्षद चावला याच्यावर कायदेशीर कारवाई केली आहे. या प्रकरणाचा पुढील तपास महिला सहाय्यक पोलीस निरीक्षक पूनम श्रीवास्तव करत आहेत.

# सिद्धीबागेत तरुणावर कोयत्याने हल्ला

## हल्लेखोराला नागरिकांनी पकडून दिले पोलिसांच्या ताब्यात

नगर – शहरातील गजबजलेल्या सिद्धीबाग परिसरात एका तरुणावर लोखंडी कोयत्याने सपासप वार करून त्याला गंभीर जखमी केल्याची धक्कादायक घटना ७ एप्रिल रोजी दुपारी घडली आहे. या प्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जखमीवर रुग्णालयात उपचार सुरु असून हल्लेखोराला नागरिकांनी पकडून पोलिसांच्या ताब्यात दिले.

याबाबत आशिष अशोक गायके (वय ३५, रा. बुऱ्हाणनगर) यांनी फिर्याद दिली आहे. त्यांचा मेहुणा चक्रधर दिलीप दुमाने (वय २१, रा. बोल्हेगाव, मूळ रा. गडचिरोली) हा दुपारी दोनच्या सुमारास सिद्धीबाग परिसरात असताना हा हल्ला झाला. हनुमान लक्ष्मण सूर्यवंशी (रा. रामलिंग मुदगड, ता. निलंगा, जि. लातूर) असे हल्ला करणाऱ्या आरोपीचे नाव आहे. अज्ञात कारणावरून झालेल्या या वादात आरोपीने रागाच्या भरात लोखंडी कोयता काढून चक्रधर याच्या डोक्यावर आणि हातावर गंभीर वार केले.

रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या चक्रधरला तातडीने जिल्हा रुग्णालयात हलवण्यात आले, मात्र प्रकृती चिंताजनक असल्याने त्याला पुढील उपचारासाठी मार्केटयार्ड येथील खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. घटनेची माहिती मिळताच पोलीस निरीक्षक जगदीश भांबळ यांनी पथकासह घटनास्थळी धाव घेतली. हल्लेखोर हनुमान सूर्यवंशी यास सिद्धीबागेतील नागरिकांनी पकडून ठेवले होते. पोलिसांनी त्यास ताब्यात घेत त्याच्या विरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम ११८(१), ११५(२), ३५२ आणि ३५१(२) नुसार गुन्हा नोंदवला असून महिला पोलीस हवालदार गडाख या प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत.

# राहुरी विधानसभा पोटनिवडणुकीत उमेदवारांच्या खर्चावर काटेकोर लक्ष ठेवा

## दहा लाख रुपयांपेक्षा जास्त संशयास्पद व्यवहारांची माहिती थेट प्राप्तिकर विभागाला देणे बंधनकारक : खर्च निरीक्षक व्ही. कुमार यांचे निर्देश

नगर – राहुरी विधानसभा पोटनिवडणुकीच्या पार्श्वभूमीवर उमेदवारांनी निवडणुकीसाठी स्वतंत्र बँक खाते उघडणे सक्तीचे असून, बँकांमधील दहा लाख रुपयांपेक्षा जास्त संशयास्पद व्यवहारांची माहिती थेट प्राप्तिकर विभागाला देणे बंधनकारक असल्याचे निर्देश खर्च निरीक्षक व्ही. कुमार यांनी दिले. राहुरी विधानसभा पोटनिवडणुकीच्या अनुषंगाने खर्च, माध्यम व उत्पादन शुल्क विभागाच्या आढावा बैठकीत ते बोलत होते. बैठकीस जिल्हा परिषदेचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी शैलेश मोरे, उपमुख्य लेखा व वित्त अधिकारी बाबासाहेब घोरपडे, उत्पादन शुल्क अधीक्षक प्रमोद सोनोने, ऋषिकेश इंगळे, अग्रणी बँकेचे अधिकारी आशिष नवले, जिल्हा माहिती अधिकारी सुरेश पाटील तसेच माहिती अधिकारी अमोल महाजन उपस्थित होते.



व्ही. कुमार म्हणाले, निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार उमेदवारांच्या निवडणूक खर्चाची नियमित तपासणी केली जाणार आहे. प्रत्येक तपासणीदरम्यान किमान तीन दिवसांचे अंतर असणे आवश्यक असून, त्यानुसार १५, १८ आणि २१ एप्रिल रोजी खर्च तपासणी निश्चित करावी. तपासणीवेळी उमेदवारांचे प्रतिनिधी उपस्थित नसल्यास त्यांना रीतसर नोटीस पाठवून कळविण्यात यावे.तसेच अंतिम उमेदवारांची यादी तयार करून त्यांच्या खर्चाचा तपशीलवार अहवाल खर्च पथकाने नियमानुसार तयार करावा, असेही त्यांनी स्पष्ट केले. माध्यम प्रमाणन व नियंत्रण कक्षाच्या माध्यमातून वर्तमानपत्रे, दूरचित्रवाणी तसेच समाजमाध्यमांवर बारकाईने लक्ष ठेवावे. 'पेड न्यूज'ची सखोल तपासणी करून जाहिरात खर्चाचे अहवाल वेळेत सादर करावेत. याशिवाय 'सी-व्हिजिल' प्रणालीवर प्राप्त होणाऱ्या नागरिकांच्या तक्रारींवर तातडीने कारवाई करावी, असे निर्देश त्यांनी दिले.

एक खिडकी योजनेअंतर्गत उमेदवारांना वाहन व प्रचार फेऱ्यांसाठी परवानग्या देण्याची प्रक्रिया पारदर्शकपणे राबवावी. प्रचार सभेस परवानगी घेऊनही सभा झाली नसल्यास त्याची खातरजमा करावी. प्रचार फेऱ्या व सभांचे चित्रीकरण करण्यासाठी व्हिडिओ निरीक्षण पथके कार्यरत असून, त्यांच्या माध्यमातून नियमित अहवाल संकलित करावेत.

पोलीस विभाग, राज्य उत्पादन शुल्क विभाग तसेच भरारी पथकांनी मतदारसंघ व परिसरातील अवैध धंद्यांवर कारवाई करावी. संबंधित पथकांनी दररोजच्या कारवाईचे अहवाल अद्ययावत ठेवून एकत्रित अहवाल वेळेत सादर करावा. सर्व संबंधित अधिकाऱ्यांनी आपापल्या जबाबदाऱ्या पारदर्शकपणे आणि काटेकोरपणे पार पाडाव्यात, अशा सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या.

# भविष्य सांगण्याच्या बहाण्याने वृद्धांना लुटणारे दोघे गजाआड

नगर – वृद्ध नागरिकांना गाठून त्यांचे भविष्य सांगतो असे भासवून त्यांच्याकडून सोन्याचे दागिने लंपास करणाऱ्या दोन भामट्यांना कोतवाली पोलिसांनी मोठ्या शिताफीने जेरबंद केले आहे. पोलिसांनी या आरोपींकडून चोरीला गेलेल्या दोन सोन्याच्या अंगठ्या हस्तगत केल्या आहेत. लुकमान सुलेमान मदारी (वय २४) व अल्ताफ हुसेन मदारी (वय २६, दोघे रा. शिरूर, जि. पुणे, हल्ली रा.निघोज, ता. पारनेर) अशी आरोपींची नावे आहेत.

चोरीला गेलेल्या दोन सोन्याच्या अंगठ्या पोलिसांनी केल्या हस्तगत



या आरोपींनी शहरातील दोन वेगवेगळ्या ठिकाणी ज्येष्ठ नागरिकांना आपले लक्ष केले होते. २८ मार्च रोजी एकाच दिवशी १ तासाच्या अंतराने शहरातील पुणे बस स्थानक तसेच केडगाव वेशीसमोरील डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यासमोर या घटना घडल्या होत्या. पहिल्या घटनेत फिर्यादी अरुण सहादु निंबाळकर (वय ७४ वर्ष) हे पुणे एसटी बसस्थानकात बसची वाट पाहत असताना, त्यांना भविष्य सांगण्याच्या बहाण्याने फसवून त्यांची सोन्याची अंगठी चोरली होती.

तर दुसऱ्या घटनेत फिर्यादी संतोष चंद्रसेन गायकवाड (वय ६८ वर्ष) हे केडगाव येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यासमोर बसलेले असताना दोन अनोळखी व्यक्तींनी त्यांना गाठले. भविष्य सांगण्याच्या बहाण्याने त्यांचा विश्वास संपादन करून, हातातील सोन्याची अंगठी २० रुपयांच्या नोटेमध्ये गुंडाळून खिशात ठेवल्याचे भासवले आणि ती लंपास केली होती.

याबाबत कोतवाली ठाण्यात दोन वेगवेगळे गुन्हे दाखल करण्यात आले होते. पोलिसांनी तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे तपास करून दोघांना ताब्यात घेतले. चौकशीत त्यांनी गुन्ह्याची कबुली दिली असून त्यांच्याकडून चोरीला गेलेल्या १,२०,००० रुपये किमतीच्या दोन सोन्याच्या अंगठ्या (७ ग्रॅम आणि ५ ग्रॅम वजनाच्या) हस्तगत करण्यात आल्या आहेत. सदरची कारवाई पोलिस निरीक्षक संभाजीराव गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक प्रविण पाटील, महिला पो.हे.कॉ. रोहिणी दरंदले, पोलिस अंमलदार राहुल शिंदे, दौंड, दिपक रोहकले, सत्यम शिंदे, सुरज कदम, सचिन लोळगे, राम हंडाळ, दक्षिण मोबाईल सेलचे राहुल गुंडू यांच्या पथकाने केली आहे.

# रस्त्याच्या वादातून शेतकऱ्याला मारहाण


नगर – शेतातून रस्ता तयार करण्याच्या कारणावरून झालेल्या वादातून एका शेतकऱ्याला लाकडी दांडक्याने आणि लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण करण्यात आल्याची घटना देहरे परिसरात घडली आहे. याप्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात एकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत नागदेव बाजीराव पिंपळे (वय ४६, रा. काळे वस्ती, देहरे) यांनी फिर्याद दिली आहे. त्यांच्या तक्रारीनुसार, देहरे येथील शेत गट क्रमांक १६/६ मध्ये ही घटना घडली. फिर्यादी पिंपळे हे त्यांच्या मालकीच्या शेतातून रस्ता तयार करण्याचे काम करत होते. यावेळी त्याच परिसरात राहणारा आरोपी जयराम सुरेश आग्रे हा तिथे आला. त्याने पिंपळे यांना 'तू हा रस्ता बंद कर' असे म्हणत वाद घालण्यास सुरुवात केली.

पिंपळे यांनी ही शेती माझी असून मी रस्ता करणारच असे उत्तर दिल्यावर आरोपीचा राग अनावर झाला. त्याने पिंपळे यांना शिवीगाळ करत लाथाबुक्क्यांनी मारहाण करण्यास सुरुवात केली. तसेच लाकडी दांडक्याने पिंपळे यांच्या हाताच्या कांबीवर जोरात प्रहार केला. तसेच यापुढे रस्ता केल्यास जिवे मारण्याची धमकीही दिली. मारहाणीत जखमी झालेल्या पिंपळे यांना उपचारासाठी तातडीने खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. तेथे त्यांनी दिलेल्या जबाबावरून एमआयडीसी पोलिसांनी जयराम आग्रे याच्याविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम ११८(१), ११५(२), ३५२ आणि ३५१(२) प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.

भोजवानी ॲण्ड भोजवानी कंपनीचे


# वासुदेव भोजवानी यांचे हृदयविकाराने निधन



पुणे – कोरेगाव पार्क, पुणे येथील रहिवाशी वासुदेव रेवाचंद भोजवानी (वय ८३) यांचे ७ एप्रिल रोजी हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर पुणे येथील धोबीघाट येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. कापडबाजार,अहिल्यानगर येथील भोजवानी ॲण्ड कंपनीचे ते संचालक होते.

त्यांच्या मागे पत्नी, दोन मुली, भावजई, जावई, नातवंडे असा परिवार आहे. कांचन आणि दिव्या यांचे ते वडील तर स्व.एल.आर.भोजवानी यांचे ते बंधू होत. वासुदेव हे सिंधी सोशल ग्रुप व चाणक्य ॲकेडमीचे चेअरमन होत.

# महेंद्र हापसे यांचे अल्प आजाराने निधन



नेवासा – नेवासा बुद्रुक येथील रहिवासी महेंद्र गोरखनाथ हापसे (वय ५३) यांचे ८ एप्रिल रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नेवासा बु. येथे राहत्या घरी शेतात अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे पत्नी, आई, भाऊ, भावजय, १ मुलगा, १ मुलगी असा परिवार आहे. अविनाश हापसे यांचे ते मोठे बंधू तर यशराज व सृष्टी हापसे यांचे ते वडील होत.

# माजी महापौर अभिषेक कळमकरवर अत्याचाराचा गुन्हा दाखल

नगर – नोकरी मिळवून देण्याचे आमिष दाखवून एका २७ वर्षीय युवतीवर कारमध्ये अत्याचार केल्याची घटना समोर आली आहे. याप्रकरणी पिडीतेने दिलेल्या फिर्यादीवरून माजी महापौर अभिषेक कळमकर याच्याविरुद्ध भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत पिडीत युवतीने दिलेल्या फिर्यादीत म्हंटले आहे की, मे २०२४ मध्ये लोकसभा निवडणुकीच्या प्रचारादरम्यान पीडित युवतीची ओळख अभिषेक कळमकर याच्याशी झाली होती. युवतीने ती बेरोजगार असल्याचे सांगितल्यावर कळमकर याने तिला नोकरीसाठी मदत करण्याचे आश्वासन देत तिचा मोबाईल क्रमांक घेतला होता. त्यानंतर जुलै २०२४ मध्ये त्याने युवतीला संपर्क साधून शोरूममध्ये काम देण्याच्या बहाण्याने बेलेश्वर मंदिर परिसरातील नगर – पाथर्डी रस्त्यावर बोलावून घेतले.

पीडिता तिथे पोहोचल्यानंतर कळमकर याने तिला स्वतःच्या कारमध्ये बसवले. नगर क्लबच्या पुढे निर्जन ठिकाणी कार उभी करून त्याने तिला पिण्यासाठी पाण्याची बाटली दिली. पाणी पिल्यानंतर पीडितेला ग्लानी आली असता, आरोपीने तिला नोकरीचे आमिष दाखवून तिच्या इच्छेविरुद्ध कारमध्येच अत्याचार केला. या कृत्यानंतर त्याने पीडितेला धमकावून सोडून दिले.

काही दिवसांनी आरोपीने पुन्हा संपर्क साधून पीडितेकडे भेटीची मागणी केली. तिने नकार दिला असता, त्याने कारमधील घटनेचे फोटो आणि व्हिडिओ सोशल मिडीयावर व्हायरल करण्याची धमकी दिली. तसेच, भेटायला न आल्यास जीवे मारण्याचीही भीती घातली. सामाजिक दबावामुळे आणि भीतीपोटी पीडितेने इतके दिवस मौन पाळले होते. मात्र, आरोपीवर इतरही गुन्हे दाखल झाल्याचे समजताच पीडितेने हिंमत करून पोलिसांत धाव घेतली. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस करत आहेत.

# गृहिणी

## आरोग्य

### पोहे खाण्याचे फायदे

पोहे शरीरासाठी फायदेशीर मानले जातात. ते मऊ असल्याने लहान मुले सहज खाऊ शकतात. पौष्टिकतेने भरपूर असण्यासोबतच ते सहज पचते. पोहे अनेक प्रकारच्या पोषकतत्वांनी समृद्ध आहे. पोटॅशियम, फायबर, प्रथिने आणि सोडियम इत्यादी चांगल्या प्रमाणात आढळतात. याच्या सेवनाने मुलाचे पोट तर चांगलेच भरते, पण त्याच्या शरीराला शक्तीही मिळते. पोह्याचे सेवन केल्याने मुलांना बद्धकोष्ठता आणि गॅससारख्या समस्यांपासून आराम मिळतो. पोह्याचे सेवन केल्याने मुलांच्या शरीरातील कमजोरी दूर होऊन त्यांना शक्ती मिळते. पोह्यात भरपूर लोह असते. जे लहान मुलांना ॲनिमियासारख्या आजारांपासून दूर ठेवण्यास उपयुक्त आहे. याशिवाय मुलांच्या शरीरातील हिमोग्लोबिनची पातळीही राखते. तुम्हालाही तुमच्या मुलाला ग्लूटेन फ्री फूड खायला द्यायचे असेल, तर तुम्ही तुमच्या मुलाच्या आहारात पोहे जरूर समाविष्ट करा. त्यात ग्लूटेनचे प्रमाण खूपच कमी असते. त्यामुळे मुलांना फूड ॲलर्जी होण्याची शक्यता खूपच कमी असते.

## पाककला

### पपईचे लोणचे

**साहित्य :** कच्ची पपई १ मध्यम आकाराची (सोलून आणि मध्यम तुकडे किंवा लांब काप करून), मोहरीची डाळ २-३ मोठे चमचे, लाल तिखट १-२ चमचे (तिखटाप्रमाणे), हळद १ छोटा चमचा, हिंग पाव चमचा, मीठ चवीनुसार, तेल अर्धी वाटी (शेंगदाणा किंवा मोहरीचे तेल), लिंबाचा रस २ मोठे चमचे (किंवा व्हिनेगर), मेथी दाणे अर्धा चमचा (किंवा मेथी पूड),

**कृती** सर्वात आधी पपई सोलून त्याच्या आतील बिया काढून टाका, पपईच्या लांब फोडी करा किंवा किसून घ्या. या फोडींना थोडे मीठ आणि हळद लावून १०-१५ मिनिटे बाजूला ठेवा, त्यानंतर पपईतून सुटलेले जास्तीचे पाणी काढून टाका, एका मोठ्या बाऊलमध्ये पपईच्या फोडी घ्या, त्यात मोहरीची डाळ, लाल तिखट, मीठ आणि मेथी पूड घालून व्यवस्थित मिक्स करा, आता एका छोट्या कढईत तेल चांगले गरम करा, तेल गरम झाले की त्यात हिंग टाका आणि गॅस बंद करा, हे कोमट झालेले तेल पपईच्या मिश्रणावर ओता, तेल खूप कडकडीत नसावे, अन्यथा मसाले जळू शकतात, शेवटी त्यात लिंबाचा रस घाला, यामुळे लोणच्याला छान आंबट चव येते आणि ते टिकण्यास मदत होते.

## वास्तू

### बेडरुम संबंधी

* बेडरुम घराच्या दक्षिण दिशेला नसायला हवी. त्यामुळे झोपण्यास अडथळा निर्माण होतो. दक्षिण दिशेला बेड ठेवल्याने पितृदोष तयार होतो. कधीही झोपताना दक्षिण दिशेला पाय ठेवून झोपू नका.

* घराच्या दक्षिण दिशेला तुळशीचे रोप, मंदिरअसे केल्याने आपल्या जीवनात नकारात्मक येते.

## सौंदर्य

* दोन चमचे कोरफड जेलमध्ये एक चमचा बिटाचा रस मिसळून चेहऱ्यावर मालिश केल्यास चेहऱ्याला गुलाबी ग्लो येईल.

* केस दाट होण्यासाठी नियमीतपणे भृंगराज तेल लावावे.

## सल्ला

कोणत्याही कोरड्या नाश्त्यावर वरून थोडा चाट मसाला टाकावा याने चव वाढते.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

गुरुवार, दि. ९ एप्रिल २०२६

**---, शके १९४८ पराभवनामसंवत्सर, चैत्र कृष्णपक्ष, मूळ ०८।४९, सूर्योदय ०६ वा. ३१ मि. सूर्यास्त ०५ वा. ३२ मि.**

## राशिभविष्य

**मेष** : आपल्या कुटुंबात बऱ्याच काळापासून चालणारा एखादा वादाचा विषय आपणास अस्वस्थ करेल. आर्थिक आणि सामाजिक कामांमुळे अडथळे.

**वृषभ** : व्यापारात आपल्या सेवेच्या मोबदल्यात योग्य लाभ मिळेल. आजचा दिवस महत्वपूर्ण ठरेल. व्यापार-व्यवसायात देवाण-घेवाण टाळा.

**मिथुन** : आर्थिक बाबतीत एखादी विषम परिस्थिती उद्भवण्याआधी आपली आर्थिक स्थिती तपासून स्थिती पाहावी लागेल. शत्रूंपासून सावध राहा.

**कर्क** : काही गोष्टी आपल्या जीवनात आकस्मिकरीत्या आनंद आणतील. आपल्या नवीन आवडींना प्रोत्साहन द्याल. विशेष वित्तीय अडचणींवर चिंतन.घरात मंगल कार्याचा योग.

**सिंह** : जीवनात आलेल्या या परिवर्तनाचा आनंद घ्याल. दिवस आनंदात जाईल. त्यामुळे घरांत उत्साहाचे वातावरण होईल. कौटुंबिक वेळ अनुकूल राहील.

**कन्या** : मानसन्मानाच्या क्षेत्रात वाढ होईल. कामात एखाद्याचे सहकार्य प्रगतीचे कारण बनेल.

**तूळ** : आर्थिक विषयांमध्ये थोड्या अडचणी येऊ शकतात. करीयरसंदर्भातील नवी संधी मिळण्याची शक्यता. तुमच्या सार्मथ्यात वाढ.

**वृश्चिक** : आजचा दिवस आपणास पैसे मिळवण्याच्या आणि व्यापाराच्या नव्या संधी देईल परंतु घाई करणे अडचणीत टाकू शकते.


**धनु** : रहाते घर बदलण्यासाठी आजचा दिवस उत्तम आहे. राजकीय व्यक्तींसाठी स्थिती संतोषजनक राहील. आर्थिक लाभ होईल. आळस करू नये, कामे वेळेत करण्याचा प्रयत्न करा.

**मकर** : आज आपला जोडीदार किंवा प्रिय व्यक्ती त्याच्या मनातील इच्छा पूर्ण करण्यासाठी आपल्यावर दबाव आणू शकतो.

**कुंभ** : घरगुती बाबतीत अधीरता टाळा. आर्थिक बाबतीत काळ अनुकूल आहे. आज आपल्या स्वतःच्या तर्कांना बळ मिळू शकेल.

**मीन** : सामाजिक कार्यांमध्ये सहयोग अनुकूल राहील व मान-सन्मान वाढेल. मुले त्रास देऊ शकतात. अनावश्यक चिंता टाळा. मतभेदांपासून लांब रहा.


## शब्दगंध क्र. ७४०५ सौ.शैलजा कुलकर्णी



**आडवे शब्द :-** २) अरबस्तानचा रहिवासी ५) भडकलेला अग्नी ७) 'मुख्य वस्तूपेक्षा गौण गोष्टीचेच अधिक माहात्म्य' या अर्थाची म्हण ९) भय; भीती १०) कहाणी; गोष्ट १३) दार; द्वार; दरवाजा १५) पोस्ट; मेल; डाक १७) चोप; ताडन १९) फसविणारा; लुच्चा २०) नसणारा; अनवश्य २२) सूड; वचपा २५) पैसा; अडका २६) अगदी गोल; वाटोळा २७) ऊस, फळ यातील द्रव; स्वाद; गोडी

**उभे शब्द :-** १) विनाश करणारा २) इच्छा; आकांक्षा ३) राख; राखण; राखी ४) पुरता नाश ५) वर्तमान दिवस; चालू दिवस ६) गोंधळ; गलका; गलबला ८) धनुष्यबाण ११) रुबाब; शान; ऐट; तोरा १२) लहान मूल १४) हक्कदार; उत्तराधिकारी १६) पाठोपाठ जाणे १८) किल्लस; कंटाळा; त्रास २१) रागीट; तापट २३) भाव; किंमत; प्रत्येक; हर २४) प्रकाश वगैरेचा मोठा प्रवाह

### शब्दगंध क्र. ७४०४ चे उत्तर



# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

**सुविचार** : ज्याच्याकडे ओंजळीतल दुसऱ्याला देण्याची ताकद आहे तोच खरा माणूस.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### ३ चेंडूमध्ये ३ विकेट घेतल्यावर हॅटट्रिकच का होते?

क्रिकेटमध्ये, जेव्हा एखादा गोलंदाज सलग तीन चेंडूत तीन विकेट घेतो तेव्हा त्याला हॅटट्रिक म्हणतात. क्रिकेटमध्ये हॅटट्रिक घेणे खूप कठीण मानले जाते. खूप कमी गोलंदाजांना ही कामगिरी करता येते. पण तुम्हाला हॅटट्रिक या शब्दामागचा इतिहास माहिती आहे का?

क्रिकेटमध्ये हॅट्रिक घेणे खूप कठीण मानले जाते. कारण सलग तीन चेंडूवर तीन विकेट घेण्यासाठी गोलंदाजाकडे केवळ कौशल्यच नाही तर दबावाच्या वेळी शांत राहण्याची क्षमता देखील असावी लागते. आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये टेस्ट, वनडे आणि टी-२० या तिन्ही प्रकारांमध्ये आतापर्यंत शेकडो हॅट्रिक झाल्या आहेत आणि प्रत्येक हॅट्रिक ही चाहत्यांसाठी खास आठवण बनते. पण क्रिकेटमध्ये सलग तीन चेंडूवर तीन विकेट घेतल्याला 'हॅट्रिक' का म्हणतात? हा प्रश्न अनेक क्रिकेटप्रेमींना पडतो. 'हॅट्रिक' या शब्दाचा क्रिकेटशी नेमका काय संबंध आहे, यामागची गोष्ट खूप रंजक आहे. चला, याचा इतिहास थोडक्यात जाणून घेऊया.

हॅट्रिक या शब्दाची सुरुवात १९ व्या शतकात इंग्लंडमध्ये झाली. १८५८ साली झालेल्या एका सामन्यात एच.एच.स्टीफेन्सन या गोलंदाजाने उत्कृष्ट कामगिरी करून मोठी प्रसिद्धी मिळवली होती. स्टीफेन्सन उजव्या हाताने राउंडआर्म वेगवान गोलंदाजी करत, उजव्या हाताने फलंदाजी करत आणि कधी-कधी विकेटकीपिंगही करत असत. त्यांनी हाईट पार्क ग्राउंड येथे ऑल इंग्लंड संघाकडून खेळताना हॉलम आणि स्टेवली संघाविरुद्ध सलग तीन चेंडूवर तीन विकेट्स घेतल्या. त्या काळात ही कामगिरी अत्यंत खास मानली जात होती. त्यामुळे चाहत्यांनी आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी त्यांचा सन्मान करण्याचा निर्णय घेतला.

सामना संपल्यानंतर प्रेक्षकांनी मैदानात पैसे जमा केले आणि त्या पैशांतून एक नवी टोपी विकत घेतली. ही टोपी स्टीफेन्सन यांना सन्मान म्हणून भेट देण्यात आली. म्हणजेच सलग तीन विकेट्स घेणाऱ्या गोलंदाजाला 'हॅट' मिळाली आणि या खास कामगिरीला 'ट्रिक' असे संबोधले गेले. याच घटनेतून 'हॅट-ट्रिक' हा शब्द बोलायला सुरवात झाली. यानंतर १८७८-७९ मध्ये फ्रेड स्पॉफर्थ यांनी टेस्ट क्रिकेटमध्ये पहिली हॅट्रिक घेतली. त्या वेळी वृत्तपत्रांमध्ये पहिल्यांदाच 'हॅट्रिक' हा शब्द छापून आला आणि तेव्हापासून हा शब्द क्रिकेटच्या भाषेचा कायमचा भाग बनला.

आज हॅट्रिक हा शब्द फक्त क्रिकेटपुरता मर्यादित राहिलेला नाही. हॉकी, फुटबॉल आणि इतर अनेक खेळांमध्येही एखाद्या खेळाडूने सलग तीन गोल किंवा तीन मोठी कामगिरी केली, तर त्याला हॅट्रिक असेच म्हटले जाते.

मात्र या शब्दाची मूळ परंपरा क्रिकेटमधूनच सुरू झाली आहे. त्यामुळे पुढच्या वेळी जेव्हा एखादा गोलंदाज हॅट्रिक करताना दिसेल, तेव्हा लक्षात ठेवा की त्या फक्त सलग तीन विकेट्स नाहीत, तर १८५८ मध्ये सुरू झालेल्या त्या जुन्या परंपरेचा उत्सव आहे. जिथे एका उत्कृष्ट कामगिरीच्या बदल्यात गोलंदाजाला टोपी भेट देऊन सन्मानित करण्यात आले होते.

### हव्यास

अनेक वर्षांपूर्वीची गोष्ट आहे. एक शेतकरी त्याच्या कुटुंबासह एका गावात राहत होता. एकदा शेतकऱ्याने आपल्या मुलांना अंडी खायला मिळावीत म्हणून एक कोंबडी विकत घेतली. काही दिवसांनी तिने अंडी द्यायला सुरूवात केली. आणि काही आश्चर्य तिने पहिलेच अंडी सोन्याचे दिले. ते बघून शेतकरी आनंदित झाला. त्याने ते अंडी बाजारात नेऊन विकले. त्याला खूप पैसे मिळाले. दुसऱ्या दिवशीही कोंबडीने सोन्याचे अंडी दिले.

आता काय तो एकदम खूश झाला. तेही अंडी त्याने बाजारात विकले. अशा प्रकारे कोंबडी रोज एक सोन्याचे अंडी देऊ लागली. तो ते बाजारात विकू लागला. रोज मिळणाऱ्या पैशांमुळे त्याची परिस्थिती बदलू लागली.

तो चांगले जीवन जगू लागला. हे पाहून त्याने एक दिवस विचार केला की, कोंबडी जर रोज सोन्याचे अंडी देत असेल तर तिच्या पोटात कितीतरी सोन्याची अंडी असतील. शेतकरी आता अति विचार करू लागला. कोंबडीला मारून तिच्या पोटातली सर्व अंडी काढून विकली तर खूप श्रीमंत होऊ असे त्याला वाटले. त्या हव्यासापायी त्याने त्या कोंबडीला मारले.

पण कोंबडीच्या पोटात त्याला एकही सोन्याचे अंडी सापडले नाही, तो उदास झाला. कोंबडी मेल्यामुळे त्याला आता रोजचे सोन्याचे अंडी मिळणेही बंद झाले. व त्याला खूप पश्चाताप झाला.

तात्पर्य : अतिलोभ नेहमी वाईट असतो व नुकसान होते.

## जीवन का अमृत (भाग १)



### अहम्

१७. भजन-सिमरन की शरण लेना हर मर्ज़ की दवा है और यह आपके मन के भटकने की प्रवृत्तियों को काबू करने में सहायक होगा। आप मन के भय को न बढ़ाएँ क्योंकि यह आत्मा ही है, जो मन को जीवन प्रदान करती है। जब आत्मा अंतर की दिव्यता से ताकत पाती है, तो इतनी शक्तिशाली हो जाती है कि यह मन के आदेशों को झुठला सके। शब्द धारा को एकाग्र होकर सुनने से मन असीम शांति पाता है और तब यह दिव्य चक्षु पर ही टिका रहना चाहता है। कृपया आप अपने भजन-अभ्यासों में ज्यादा शांत रहना सीखें और सत्गुरु, जो कुछ ठीक समझे और दे, उसे पाने के लिए धैर्यपूर्वक इंतजार करें ।

१८. अहंकार का खत्म होना, जन्म-मरण के अनन्त चक्र से मुक्त होने का एकमात्र इलाज है। यह उन लोगों की सही परख है, जो अमर प्रभुत्व से या संसार में फैली रूहानी धारा से एकमेक हो चुके हैं। अहम् को पूर्णतया नष्ट करने के लिए की गई हर कोशिश, सही दिशा में की गई कोशिश है इसका रहस्य है, आत्मा के सभी व्यक्तिगत पक्षों को हटाकर आत्मा को इनसे रहित करना ।

अपने अहम् भाव को समाप्त करने के बहुत से तरीकों में से कोई भी तरीका हमें मुक्ति के लक्ष्य तक नहीं पहुँचाता, क्योंकि ऐसे तरीकों से, जिनकी कि इस संसार में बाढ़ सी आई हुई है, हमारे अहम् भाव को बढ़ावा ही मिलता है, जो कि ताकत में बढ़ता जाता है और खत्म होने का नाम नहीं लेता। जब तक हम दिव्य योजना में चेतन सहकार्यकर्ता नहीं बनते, तब तक हम निस्स्वार्थ नहीं बन सकते ।

प्रभु की ज्योति और

१९. आपकी सच्चाई को जानने की और इसका पूर्ण अनुभव पाने की तीव्र चाहत को जानकर मुझे खुशी हुई।

सच्चाई का अर्थ है : आत्मा, जो कि प्रभु की अंश है, का वापिस प्रभु से जुड़ जाना और यह देन सत्गुरु की दया से प्राप्त होती है। सत्गुरु परलोक के रहस्यों की दीक्षा देकर इंसान को की अनहद वाणी से जोड़ देता है, ताकि धीरे-धीरे परम पिता के सच्चे घर की यात्रा की जा सके। मुझे खुशी है कि उपरोक्त चाहत आपके हृदय में सर्वोपरि है और इसके लिए आप अन्य सब कुछ छोड़ देने के लिए तैयार हैं। जो इसके लिए तड़पते हैं, वे पाते हैं। भूखों के लिए रोटी है और प्यासों के लिए पानी है।

२०. मन की उड़ान को काबू में करने के लिए आपको सलाह दी जाती

(क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## चिरंतन प्रेमाकडे वाटचाल (नाती घट्ट विणू या)

### अशांत मन

किंवा त्याच्यामध्ये बदल करण्याची वाट आपल्याला बघावी लागत नाही. याचाच अर्थ आपली शक्ती वाढते आणि आपल्याला आपले संस्कार बदलता येतात. जर आपल्या परिस्थितीसाठी इतरांना दोष देत राहिलो तर आपले जुने संस्कार कधीच बदलणार नाहीत. वागण्याच्या आणि प्रतिक्रिया देण्याच्या आपल्या जुन्या पद्धती तशाच चालू राहतील. स्वत:वर प्रेम करण्यासाठी इतरांना दोष देण्याचा संस्कार आपल्याला आधी बदलावा लागेल. कोणत्याही परिस्थितीत हे थांबायलाच हवं.

सुरेश ओबेरॉय :

माझं मन दुखावलं जाईल असं जर कोणी माझ्याशी बोललं तर नंतर मला त्याचा त्रास होतो. मग एखाद्या मित्राकडे मी माझं मन मोकळं करतो.

शिवानीदीदी : नातं चांगलं राहण्यासाठी किंवा अन्य काही कारणाने तुम्ही त्या वेळी उलटं बोलला नसाल. तुम्हाला आतून त्रास झाला कारण तुम्ही फक्त बाहेरून शांत राहिलात पण तुमचं मन अशांत होतं.

सुरेश ओबेरॉय :

ही भावना अनेक वर्षं माझ्या मनात तशीच राहिली.

शिवानीदीदी :

स्वत:शी बोलताना काळजीपूर्वक बोला, कारण तुम्ही ऐकत आहात. तुम्ही उलटं न बोलल्यामुळे इतरांबरोबर चांगलं नातं जपू शकता. पण जेव्हा ती घटना तुम्ही वारंवार आठवत राहाल, तेव्हा तुमचं तुमच्याशी असलेलं नातं खराब कराल. मनात त्या गोष्टी सारख्यासारख्या कोण घोळवत राहतं? तुम्ही स्वत:च.

सुरेश ओबेरॉय :

कधीकधी मला वाटतं की मी त्या क्षणी बोलून टाकायला हवं होतं. विषय तेव्हा आणि तिथेच संपला असता.

शिवानीदीदी :

विषय संपला नसता तर सुरुवात तुम्ही केल्यामुळे अधिकच ताणला गेला असता. उलटं न बोलणं हा शहाणपणा आहे. याचा अर्थ प्रतिक्रिया न देण्याची शक्ती तुमच्याकडे आहे.

सुरेश ओबेरॉय :

मी शांत राहिल्याने दुसऱ्या व्यक्तीला तिच्या चुकीची जाणीव होईल ?

शिवानीदीदी : इतरांना त्यांच्या चुकांची जाणीव करून देण्यासाठी अजून एक शक्तिशाली उपाय आहे. शांत राहण्याव्यतिरिक्त आपण त्या व्यक्तीसाठी चांगले विचार करणं आणि त्या व्यक्तीला चांगले तरंग पाठवणं.

(क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

मुलगी पाहायला आलेली मराठीप्रेमी सासू... : मी तुझं मराठी ऐकल्यावरच ठरवीन की तू माझी सून होण्याच्या लायकीची आहेस की नाही! तुझं शिक्षण किती?

मुलगी : नेत्र नेत्र चहा

भावी सासू : म्हणजे?

मुलगी : आयआयटी

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

* ग्रेस चक्रीवादळ कोणत्या समुद्रात आले आहे?

– हिंदी महासागर

**– अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# आहारवेद – आरोग्य संवर्धन

### सफरचंद

१३) सफरचंदात लोह, आर्सेनिक व फॉस्फरस विपुल प्रमाणात असते, त्यामुळे रक्ताल्पता (निमिया) या आजारात नियमितपणे रोज एक सफरचंद खावे.

१४) डोळ्यांची आग होत असेल, तर सफरचंदाचा रस कापसाच्या बोळ्यावर घेऊन तो बोळा डोळ्यांवर ठेवावा.

१५) स्थूलता वाढली असेल, तर ती कमी करण्यासाठी जेवणाच्या आधी सफरचंद खावे. त्यानंतर जेवण करावे. त्यामध्ये असणाऱ्या ॲसिडमुळे खाल्लेले अन्न व्यवस्थित पचून स्थूलता कमी होते.

१६) सफरचंद हे शरीरातील पंचेंद्रियांना स्फूर्तिदायक आहे. शरीर व मेंदूचा थकवा दूर करण्यासाठी नियमितपणे रोज एक सफरचंद खावे. यामुळे कांती तेजस्वी होते व बौद्धिक थकवा कमी होऊन क्षमता वाढते.

१७) शक्यतो सफरचंद हे स्वच्छ धुऊन, पुसून न कापता संपूर्ण खावे. सहसा सफरचंद भाजून उकडून सुकवूनही खाता येते. सॅलड, कोशिंबीर, ज्युस, जेली, जॅम या स्वरूपातही सफरचंद खाता येते.

सावधानता : सफरचंद हे केवळ काश्मीरसारख्या थंड हवेच्या प्रदेशात होत असल्याने संपूर्ण देशात त्याचे वितरण होईपर्यंत ते टिकविणे आवश्यक असते, म्हणून झाडावर फळे लागल्यापासून ते बाजारात विकली जाईपर्यंत खराब होऊ नये म्हणून त्यांच्यावर अनेक औषधांचे, कीटकनाशकांचे फवारे मारले जातात. हे फवारे आपल्या शरीरासाठी हानिकारक असतात. म्हणून सफरचंदे हे सुरुवातीला शाम्पू किंवा रिठ्याच्या पाण्यामध्ये स्वच्छ धुऊन घ्यावीत व त्यानंतर साध्या पाण्यात रात्रभर भिजत ठेवावीत. सकाळी स्वच्छ पुसून त्यानंतर सफरचंदे खावीत. तसेच सफरचंद न कापता संपूर्ण खावे आणि कापलेच, तर जास्त वेळ ठेवू नये.

**(क्रमशः)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००



प्रभाग क्रमांक १४ मधील नवनिर्वाचित नगरसेवकांचा एमएसईबी माणिकनगर परसितील रहिवाशांच्या वतीने सत्कार करण्यात आला.

# नगरसेवकांच्या प्रामाणिक प्रयत्नांमुळे नागरिकांना अपेक्षित विकासकामे मार्गी

**सतीश डुंगरवाल यांचा विश्वास, एमएसईबी कॉलनीतील रहिवाशांच्या वतीने नवनिर्वाचित नगरसेवकांचा सत्कार**

नगर – बुरूडगाव रोड, माणिकनगर परिसर मागील काही काळात मोठ्या प्रमाणात विकसित झाला आहे. आमदार संग्राम जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली प्रभागातील नगरसेवकांनी विविध समस्यांचा अभ्यास करून नागरिकांना अपेक्षित विकासकामे मार्गी लावली आहेत. त्यामुळे या परिसरात प्रशस्त रस्ते, पाणी, पथदिवे, उद्याने अशी अनेक कामे झाली आहेत. शहरातील आदर्श प्रभाग म्हणून हा भाग ओळखला जातो. त्यामुळे येथील रहिवासी समाधानी आहेत. नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी सर्वच नगरसेवक तत्पर असतात. येत्या काळात नवनिर्वाचित नगरसेवक प्रभागात आणखी भरीवे विकासकामे करून उर्वरित नागरी समस्यांची सोडवणूक करतील असा विश्वास सतीश डुंगरवाल यांनी व्यक्त केला.

प्रभाग क्रमांक १४ मधील नवनिर्वाचित नगरसेवक गणेश भोसले, प्रकाश भागानगरे, मीनाताई चोपडा, सुनीता फुलसौंदर, भगवान फुलसौंदर, संजय चोपडा, एमएसईबी कॉलनीतल्या सूनबाई नगरसेविका अनिता शेटिया यांचा एमएसईबी माणिकनगर परिसतील रहिवाशांच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी सतीश डुंगरवाल बोलत होते.

याप्रसंगी अशोक लोढा, हरजीतसिंग वधवा, डॉ. चेतन चौधरी, गिरीश फिरोदिया, नरेश फिरोदिया, प्रशांत आघवडे, दीपक तलरेजा, विपुल शेटिया, गणेश गांधी, भापकर, मनोज पितळे, राहुल डुंगरवाल, सतीश बोथरा, बांठिया, कमलेश बोथरा आदी उपस्थित होते.

नगरसेवक गणेश भोसले म्हणाले की, आमदार संग्राम जगताप यांच्या दूरदृष्टीचा नेतृत्वाखाली प्रभाग १४ चा कायापालट करण्यात यश आले आहे. मूलभूत सोयी सुविधांची अनेक कामे दर्जेदार करण्यावर भर दिला आहे. या परिसरात व्यापारी वर्ग मोठ्या प्रमाणात वास्तव्यास आहे. त्यांच्याशी वेळोवेळी संवाद साधून व त्यांच्या सहकार्याने प्रभागात पथदर्शी विकासकामे झाली आहेत. संपूर्ण नगर शहरात हा प्रभाग आदर्श म्हणून ओळखला जातो. प्रभागातील नागरिकांनी मोठ्या विश्वासाने आम्हाला पुन्हा एकदा संधी दिली आहे. सर्वांना सोबत घेऊन हा विश्वास सार्थ ठरवण्यासाठी प्रामाणिकपणे प्रयत्न करू.

# प्रेरणादायी अक्षरधन

## पंडित कोण?

"मुसाफिर" वाचनीय मननीय प्रेरणादायी अक्षर धन
संकलनः दिशान फिचर्स

समाज मनाला सुखावणारी चैतन्य पालवी
डॉ. रामचंद्र देखणे
'चपराक' प्रकाशित ललित चिंतन

पंडित कुणाला म्हणावे? पंडित कोण असतो ? हे सांगणे जरा कठीण आहे पण 'ज्ञानाच्या अभ्यासाने आणि शास्त्राच्या व्यासंगाने जो मोठा होतो तो पंडित होय.' खूप ज्ञान मिळविले तर तो ज्ञानी होईल. खूप शास्त्र जाणले तर तो शास्त्री होईल. खूप ज्ञान पढले तर तो पाठक होईल. ज्ञान संपादन करणे आणि प्रेमाने ते लोकांना देणे हे पंडिताचे काम पण पाण्डित्याच्या अवस्थेला गेले की ज्ञानाचा अहंकार वाढतो. त्या पाण्डित्याने तो रूक्ष आणि शुष्क होतो आणि प्रेमतत्त्वाला दुरावतो. कबीरजींनी खूप मार्मिकपणे सांगितले आहे,

पोथी पढी पढी जग मुआ।
पंडित भया न कोय ।
ढाई अक्षर प्रेम के
पढे सो पंडित होय ।

जगभर पोथ्या पुराणे वाचून आणि ग्रंथांचे ढीगच्या ढीग पालथे घालून कोणाला पंडित होता येत नाही. त्यातून फारतर घोकमपट्टी होईल पण 'प्रेम' ही अडीच अक्षरे जो अनुभवतो आणि शिकवतो तोच पंडित होय. पंडिताच्या प्रत्येक कृतीतून त्याचे ज्ञानरूप जगापुढे उभे राहत असते. तो ज्ञानाने पवित्र झालेला असतो. ज्ञानदेव म्हणतात,

येथ ज्ञानाची पवित्रता ।
ज्ञानीची आथी।

आणि ज्ञानाचे पावित्र्यही तोच जाणतो. ते ज्ञान आपल्यापुरते मर्यादित न ठेवता साधकाची योग्यता पाहून तो ज्ञान देऊन टाकतो आणि ज्याची योग्यता नसेल त्याला त्या योग्यतेला आणून ते ज्ञान वाटून टाकतो. ज्ञानदेवांनी एक सुंदर उपमा दिली आहे,

हे बहु असो पंडित ।
धरोनि बाळकाचा हातु ।
ओळी लिही व्यक्तु।
आपणचि ।। (१३–३०)

नवीन शिकणाऱ्या मुलाला अक्षरांची ओळख करून द्यावी म्हणुन तो स्वतः पाटी–पेन्सिल हातात घेतो आणि आपल्या बोटांनी त्याची बोटे धरून त्याच्याकडून अक्षरे गिरवितो. तुकोबाराय म्हणतात– 'बाळकाचे साठी–पंते हाती धरली पाटी' खरेतर तो, पाटी अक्षरे याच्या पलीकडे गेलेला असतो पण जो अज्ञानी आहे याच्यासाठी तो पुन्हा पाटी हाती घेतो. त्याला अक्षरे शिकवतो आणि त्या अक्षरांमधून स्वतःच व्यक्त होतो. हे व्यक्तत्व म्हणजे पाण्डित्य होय.

– किशोर गांधी

# नवनागापूर येथे ९ एप्रिलपासून अखंड नामजप, यज्ञ, प्रहर सप्ताह



नगर – नवनागापुरातील गजानन कॉलनी येथील श्री स्वामी समर्थ सेवा, अध्यात्मिक विकास व बाल सु–संस्कार केंद्रात श्रीस्वामी समर्थ महाराज पुण्यतिथीनिमित्त ९ ते १५ एप्रिलदरम्यान अखंड नाम, जप, यज्ञ, प्रहर सप्ताह व सामुदायिक गुरुचरित्र पारायण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.

गुरुवारपासून सुरू होणाऱ्या या यज्ञज्ञाग सेवेअंतर्गत सकाळी १०.३० ते दुपारी १२ या कालावधीत दररोज नित्य स्वाहाकाराबरोबरच विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. सप्ताहापूर्वी बुधवारी ग्रामदेवता निमंत्रण व मंडल मांडणी होईल. ९ एप्रिल रोजी मंडल स्थापना, अग्निस्थापना, स्थापित देवता हवन होईल. १० एप्रिल रोजी गणेशयाग, मनोबोध याग. ११ एप्रिल रोजी चंडी याग. १२ एप्रिल रोजी स्वामी याग, १३ एप्रिल रोजी श्री गिताई याग, १४ एप्रिल रोजी रूद्रयाग, मल्हारी याग. १५ एप्रिल रोजी बली पूर्णाहुती, श्री सत्यदत्त पूजन, देवता विसर्जन होईल. याच दिवशी महानैवेद्य आरती मार्गदर्शन व महाप्रसादाने सप्ताहाची सांगता होईल. श्री स्वामी समर्थ पुण्यतिथीनिमित्त होणाऱ्या या सर्व कार्यक्रमांचा लाभ घ्यावा, असे आवाहन नवनागापूर येथील केंद्रातर्फे करण्यात आले आहे.

# अहिल्यानगरमध्ये लवकरच क्रिकेटसह सर्व खेळांच्या अद्ययावत व आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सुविधा उपलब्ध होणार

**आमदार संग्राम जगताप**



पुण्यात होणाऱ्या महिला क्रिकेट एकदिवसीय स्पर्धेसाठी निवड झालेल्या अहिल्यानगरच्या संघातील खेळाडूंना आ.संग्राम जगताप यांनी जर्सी देऊन शुभेच्छा दिल्या. समवेत गणेश गोंडाळ, अनुपम संकलेचा, अजय कविटकर, नगरसेवक विकी जगताप व सुरेश बनसोडे, दत्ता पानसरे, अवधूत फुलसौंदर आदींसह खेळाडू.

नगर – आपल्यातील कौशल्याला प्रोत्साहन व गुणवत्तेला संधी मिळाली तर स्वप्न साकार होतात. यासाठी खेळाडूंनी कायम प्रयत्नशील राहावे. पालकांनीही जास्तीत जास्त प्रोत्साहन देऊन मुलांना मैदानी खेळाकडे वळवावे. आता महिलांना राज्य व राष्ट्रीय स्तरावर क्रिकेटमध्ये खूप मोठ्या संधी निर्माण झाल्या आहेत. भारतीय महिलांनी विश्वचषक जिंकून क्रिकेटमध्ये ऐतिहासिक कामगिरी केली आहे. त्यांची प्रेरणा घेऊन नगरच्या महिला क्रिकेटपटूंनीही भरपूर मेहनत घेऊन स्पर्धा जिंकून नगरचे नावलौकिक वाढवावे, अशा शब्दात आ.संग्राम जगताप यांनी अहिल्यानगरच्या महिला क्रिकेट संघातील खेळाडूंना शुभेच्छा देऊन नगरमध्ये लवकरच क्रिकेटसह सर्व खेळांच्या अद्ययावत व आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सुविधा उपलब्ध करून देणार असल्याचे सांगितले.

महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या वतीने पुण्यात होणाऱ्या महिला क्रिकेट एकदिवसीय स्पर्धेसाठी निवड झालेल्या अहिल्यानगरच्या संघातील महिला खेळाडूंना आ.संग्राम जगताप यांनी जर्सी देऊन शुभेच्छा दिल्या. यावेळी जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे सचिव गणेश गोंडाळ, रणजीपटू अनुपम संकलेचा, क्रीडाप्रशिक्षक अजय कविटकर, नगरसेवक विकी जगताप व सुरेश बनसोडे, पणन महासंघाचे अध्यक्ष दत्ता पानसरे, अवधूत फुलसौंदर, अनुप काळे उपस्थित होते.

आ.संग्राम जगताप यांनी क्रिकेट संघाच्या कर्णधार श्रेया गडाख, आकांशा बोरूडे, उपकर्णधार शामल दिवे, यष्टीरक्षक वैष्णवी थिटे, पायल चव्हाण, श्रीया तिकोणे, मेहर नाज, अस्मीता पवार, समृद्धी शिंदे, ग्रीक्षा कटारिया, कोमल वाघ, प्राजक्ता क्यादर, सबुरी त्रिंबके, स्नेहल लोखंडे, साक्षी राठोड, संघ व्यवस्थापक प्रियंका पालवे, प्रशिक्षक वैष्णवी काळे, हेल्थ अँड न्युट्रीयन तज्ज्ञ चैताली मोहाडकर आदींना जर्सी व शुभेच्छा दिल्या.

# 'पोलीस शौर्य सन्मान २०२६' ने अंमलदार शाम गुंजाळ सन्मानित

नगर – कर्तव्यनिष्ठा, धाडस आणि समाजसेवेचा वसा जपणाऱ्या पोलिसांच्या सन्मानासाठी आयोजित 'पोलीस शौर्य सन्मान २०२६' या सोहळ्यात अहिल्यानगर पोलीस दलाचा दबदबा पाहायला मिळाला. यामध्ये शेवगांव पोलीस ठाण्यातील पोलीस अंमलदार शाम गुंजाळ यांना त्यांच्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल 'पोलीस शौर्य सन्मान' देऊन गौरविण्यात आले. समाजाच्या सुरक्षेसाठी आणि कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी शाम गुंजाळ यांनी वेळोवेळी दाखवलेले शौर्य आणि समर्पण वृत्तीची दखल या पुरस्काराद्वारे घेण्यात आली आहे. पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या हस्ते त्यांना हा मानाचा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

हा सन्मान केवळ माझा नसून, माझ्या संपूर्ण टीमचा आणि वरिष्ठांच्या मार्गदर्शनाचा विजय आहे. या पुरस्कारामुळे समाजाप्रती असलेली जबाबदारी अधिक वाढली असून, भविष्यातही अधिक जोमाने जनसेवेसाठी कार्यरत राहीन, असे पोलीस अंमलदार शाम गुंजाळ म्हणाले.

यावेळी उपमहापौर धनंजय जाधव, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक किरणकुमार कबाडी, पोलीस निरीक्षक धनंजय जाधव, पोलीस निरीक्षक सागर ढिकले यांच्यासह जिल्ह्यातील वरिष्ठ अधिकारी, पोलीस अंमलदार उपस्थित होते



'पोलीस शौर्य सन्मान २०२६' ने अंमलदार शाम गुंजाळ यांना सन्मानित करताना उपमहापौर धनंजय आधव आदी.



मिरजगाव येथील हिंदसेवा मंडळ संचलित भारत विद्यालयात नुतन कार्याध्यक्ष सुमतीलाल कोठारी यांचा सत्कार करण्यात आला.

# भारत विद्यालयाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी सदैव कटीबद्ध

**सुमतीलाल कोठारी यांचे प्रतिपादन, हिंद सेवा मंडळाचे नुतन कार्याध्यक्ष यांचा भारत विद्यालयात सत्कार**

नगर – भारत विद्यालयातील विद्यार्थ्यांनी नुकतेच स्पर्धा परीक्षेत चांगले यश मिळविले आहे. तसेच शाळेतील गुणवंत विद्यार्थ्यांनी मिळविलेल्या यशामुळे शाळेच्या लौकिकात भर पडत आहे. भारत विद्यालयाच्या वैभव प्राप्तीसाठी संस्थेमार्फत लागणाऱ्या सर्व प्रकारच्या मदतीसाठी आम्ही कटिबद्ध आहोत. असे आश्वासित करून विद्यालयाचा चेहरा मोहरा येत्याकाळात निश्चित बदलला जाईल, असे प्रतिपादन हिंद सेवा मंडळाचे नूतन कार्याध्यक्ष सुमतीलाल कोठारी यांनी केले.

मिरजगाव येथील हिंदसेवा मंडळ संचलित भारत विद्यालयात सुमतीलाल कोठारी, उपकार्याध्यक्ष ज्योतीताई कुलकर्णी, सहाय्यक सचिव योगेश देशमुख यांचा याप्रसंगी सत्कार करण्यात आला. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी हिंद सेवा मंडळाचे मानद सचिव संजय जोशी हे होते. या कार्यक्रमासाठी विद्यालयाचे चेअरमन डॉ.रमेश झरकर, प्रशासकीय अधिकारी संजय मुदगल, शालेय समितीचे सदस्य विकास कटारिया, गणेश झरकर, विद्यालयाचे मुख्याध्यापक किशोर खुरंगे आदींसह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

प्रस्ताविकात चेअरमन डॉ.रमेश झरकर यांनी विद्यालयाच्या विविध विकास कामांचा आढावा घेतला. विद्यालयाच्या गुणवत्ते बाबतीत त्यांनी समाधान व्यक्त केले.

सौ.ज्योतीताई कुलकर्णी म्हणाले, विद्यालयाच्या प्रगतीमध्ये कर्मचाऱ्यांचे एकजुटीचे प्रयत्न आवश्यक असतात.सर्वांनी वैयक्तिक जबाबदारी घेऊन काम केल्यास विद्यालयाची प्रगती होऊ शकते.

मानद सचिव संजय जोशी म्हणाले, विद्यालयाच्या प्रगती करता सर्व कर्मचारी प्रयत्नशील असल्याबद्दल समाधान व्यक्त करत यापुढेही अधिक जोमाने, आत्मीयतेने काम केल्यास विद्यालय निश्चितपणे प्रगतीपथावर जाईल. असा विश्वास व्यक्त केला. संस्थेमार्फत सर्व प्रकारची मदत व मार्गदर्शन करण्यात येईल असे सांगितले. तसेच विद्यालयामध्ये डिजिटल बोर्ड व त्यासाठी लागणारे सर्व सुविधा उपलब्ध करून देण्यात येतील. असे सांगितले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्व शिक्षक प्रयत्नशील होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गवारे सर यांनी केले. नवले सर यांनी आभार मानले.

# शिव पाणंद शेतरस्ता चळवळीचे राज्यस्तरीय अधिवेशन उत्साहात



नगर – पाथर्डी तालुक्यातील श्री क्षेत्र चैतन्य कानिफनाथ देवस्थान, मढी येथे महाराष्ट्र राज्य शिव पाणंद शेतरस्ता चळवळीचे पहिले राज्यस्तरीय अधिवेशन उत्साहात पार पडले. देवस्थान ट्रस्टच्या सहकार्याने आयोजित या अधिवेशनाला राज्यभरातून शेतकरी उपस्थित राहिले होते. सकाळी १० ते सायंकाळी ४ वाजेपर्यंत चाललेल्या या अधिवेशनाचे अध्यक्ष पुणे उपजिल्हाधिकारी गणेश मरकड होते. यावेळी उपविभागीय अधिकारी प्रसाद मते, पाथर्डीचे निवासी तहसीलदार किशोर सानप, राज्य उपाध्यक्ष नाथाभाऊ शिंदे, राज्य प्रसिद्धी प्रमुख रविंद्र खुडे, पोपट शेळके, अशोक कचरे आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विठ्ठल निर्मळ यांनी केले.

प्रास्ताविकात चळवळीचे प्रणेते शरद पवळे यांनी देवस्थान ट्रस्ट, अधिकारी व राज्यभरातून आलेल्या शेतकरी बांधवांचे आभार मानले. राळेगणसिद्धी–नारायणगव्हाण येथून सुरू झालेल्या शिव पाणंद चळवळीला पारनेर येथील आंदोलनानंतर अधिक गती मिळाली. पेरू वाटप आंदोलन, न्यायालयीन लढे तसेच विविध जनजागृती उपक्रमांमुळे शासनाचे लक्ष वेधले गेले आणि महत्त्वपूर्ण शासननिर्णय मिळवण्यात यश आल्याचे त्यांनी सांगितले.

पुढे बोलताना पवळे म्हणाले, राज्यभर शासननिर्णयांची प्रभावी अंमलबजावणी करून शेतकऱ्यांना प्रशासकीय व न्यायालयीन संघर्षातून मुक्त करणे आणि दर्जेदार शेतरस्त्यांचे स्वप्न पूर्ण करणे, हा आमचा मुख्य उद्देश आहे. शिव पाणंदमुळे ग्रामविकासासोबत ग्रामसीमा सुरक्षेलाही नवी दिशा मिळत आहे.

अध्यक्षीय भाषणात उपजिल्हाधिकारी गणेश मरकड यांनी शेतकऱ्यांसाठी रस्ते खुले करताना आलेले अनुभव सांगून मार्गदर्शन केले.

तसेच इतर अधिकाऱ्यांनी व चळवळीच्या पदाधिकाऱ्यांनीही आपले अनुभव मांडत उपस्थित शेतकऱ्यांना प्रेरणा दिली.

या अधिवेशनास पोपट शेळके, विठ्ठल निर्मळ, अशोक कचरे, रविंद्र खुडे, सुरेश वाळके, बाळासाहेब थोरात, राजाभाऊ नागवडे, सचिन शेळके, विजय शेलार, शांताराम पानमंद, सुरेश भुजबळ, संतोष पाचर्णे आदींसह विविध सामाजिक संघटनांचे पदाधिकारी व शेतकरी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी शरद पवळे व पोपट शेळके यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# महाराष्ट्र भूषण आदर्श शिक्षक पुरस्काराने अहिल्यानगरचे बाबासाहेब गवते यांचा गौरव



समता प्रतिष्ठानच्या (महाराष्ट्र राज्य) वतीने शिक्षण क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल बाबासाहेब जालिंदर गवते यांना महाराष्ट्र भूषण आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन सन्मानित करताना आ. सत्यजित तांबे आदी.

नगर – समता प्रतिष्ठानच्या (महाराष्ट्र राज्य) वतीने शिक्षण क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल बाबासाहेब जालिंदर गवते यांना महाराष्ट्र भूषण आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. नुकतेच झालेल्या शिक्षकांच्या सन्मान सोहळ्यात पदवीधर आमदार सत्यजित तांबे यांच्या हस्ते गवते यांना पुरस्कार प्रदान करण्यात आला.

आमदार सत्यजित तांबे यांनी गवते यांच्या कार्याचे कौतुक करून समाज घडविण्याच्या प्रक्रियेत शिक्षकाची भूमिका कणा मानली जाते. गवते यांनी आपल्या ज्ञानदानाबरोबरच कर्तृत्वातून विद्यार्थ्यांच्या जीवनात सकारात्मक बदल घडवून आणला आहे. अशा निष्ठावान शिक्षकांचा सन्मान करणे हे समाजाचे कर्तव्य आहे. त्यांचे कार्य इतर शिक्षकांसाठी निश्चितच प्रेरणादायी ठरणार असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.

सत्काराला उत्तर देताना गवते यांनी हा पुरस्कार आपल्या विद्यार्थ्यांच्या आणि सहकाऱ्यांच्या प्रेमाचे प्रतीक असल्याचे सांगितले.

# कॅलिडोस्कोप

## या बेटावरचे सगळेच बुटके!





दक्षिण पूर्वेतील एक बेट तिमोर लेस्ते येथील स्त्री-पुरुषांची उंची ही सरासरीपेक्षा कमी आढळते. ती जगातील मानवाच्या उंचीपेक्षा कमी आहे. अर्थात जेनेटिक्स, पोषण आहार आणि कोणत्या स्थितीत ही माणसं राहतात त्याआधारे प्रत्येक माणसाच्या उंचीत कमी अधिक प्रमाण दिसून येते; पण तिमोर लेस्ते येथील लोकसंख्या जागतिक प्रमाणाच्या तुलनेत कमी उंचीची आहे. त्यामागे काय कारणे आहेत, यावर संशोधन सुरू आहे.

तिमोर लेस्ते या बेटावरील पुरुषांची सरासरी उंची जवळपास १५९.८ सेंटिमीटर आहे, तर स्त्रियांची सरासरी उंची जवळपास १५१.२ सेंटिमीटर म्हणजे जवळपास ४ फूट ११.५ इंच आहे. हा आकडा जागतिक उंचीच्या सरासरीपेक्षा कमी माला जातो.

तिमोर लेस्ते हा काही कमी उंचीचा एकमेव देश नाही. लाओस येथील पुरुषाची उंची जवळपास १६०.५ सेंटिमीटर आहे, तर महिलांची सरासरी उंची १५१.३ सेंटिमीटर आहे. तर मादागास्कर या देशातील पुरुषांची सरासरी उंची जवळपास १६१.५ सेंटिमीटर आणि महिलांची उंची जवळपास १५१.२ सेंटिमीटर असते.

या देशाशिवाय ग्वाटेमाला येथील महिला या जगात कमी उंचीच्या मानल्या जातात. त्यांची सरासरी उंची जवळपास १४९.४ सेंटिमीटर असते, तर फिलिपाईन्समधील पुरुषांची सरासरी उंची जवळपास १६३.२ सेंटिमीटर आणि महिलांची उंची सरासरी १४९.६ सेंटिमीटर इतकी असते.

## इथे सर्वच निर्वस्त्र!



जगात अशीही ठिकाणे आहेत, जिथे लोकांना कपडे घालणे आवडत नाही. होय, हे खरे आहे. एका अत्यंत वेगळ्या आणि अनोख्या गावात लोकांनी शेकडो वर्षांपासून कपडे घालण्याची परंपरा पूर्णपणे सोडून दिली आहे. असे का? हे लोक गरीब आहेत का? की त्यांच्याकडे कपडे विकत घेण्यासाठी पैसे नाहीत? असे प्रश्न पडत असतील, तर त्यांचे उत्तर आहे अजिबात नाही! हे गाव सधन आहे आणि येथील लोकांकडे सर्व प्रकारच्या सुविधा आहेत, तरीही ते कपड्यांशिवायच आनंदाने राहतात.

ब्रिटनमधील हर्टफोर्डशायर काउंटीमध्ये वसलेले स्पिलप्लाट्ज हे गाव जगभरातील सर्वात अनोखे आणि चर्चेत असलेले नग्न गाव म्हणून ओळखले जाते. या गावातील लोक गेल्या ९० वर्षांपेक्षा जास्त काळ एका खास परंपरेचे पालन करत आहेत, म्हणजे कपडे न घालणे! हे ऐकून आश्चर्य वाटेल; पण हे पूर्ण सत्य आहे. या गावातील लोक शिक्षित, संपन्न आणि आधुनिक जीवनशैली जगणारे आहेत. तरीही येथे लहान मुले, वृद्ध, स्त्रिया आणि पुरुष सर्वजण आरामात आणि निर्भयपणे नग्न अवस्थेत राहतात.

हे गाव १९२९ साली इसुल्ट रिचर्डसन नावाच्या व्यक्तीने वसवले. त्यांना ही जागा इतकी आवडली, की त्यांनी येथेच कायमचे वास्तव्य करण्याचा निर्णय घेतला. आज या गावात एक पब, स्विमिंग पूल, क्लब आणि इतर सुविधाही आहेत. गावात येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला गावाचे नियम पाळावे लागतात. मजेदार गोष्ट म्हणजे, जेव्हा गावकरी शहरात किंवा बाहेर जातात, तेव्हा ते कपडे घालतात; पण गावात परत येताच ते पुन्हा आपल्या नैसर्गिक अवस्थेत येतात. अर्थातच, अतिशय थंडीच्या दिवसांत किंवा विशेष प्रसंगी कपडे घालण्याची परवानगी असते. हे गाव आपल्या अनोख्या जीवनशैलीसाठी जगभरात प्रसिद्ध आहे. येथील लोक नग्न अवस्थेत पूर्ण स्वातंत्र्याने जगतात आणि त्यांना याचा अजिबात पश्चात्ताप नाही. पर्यटकांनादेखील येथे येताना हाच नियम पाळावा लागतो. गावकऱ्यांचे म्हणणे आहे, की कपड्यांशिवाय राहणे त्यांना प्रकृतीशी एकरूप होण्याचा अनुभव देते. ते आंतरिक स्वातंत्र्य आणि शारीरिक मुक्ततेचा अनुभव घेतात. वयस्कर लोक सांगतात की, ही जीवनशैली त्यांना मानसिक शांती आणि आत्मविश्वास देते.

## सुट्टी नाकारल्यामुळे...

कंपनीने योग्यवेळी प्रेग्नंसी लिव्ह न दिल्याने एका नवजात बाळाचा मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना घडली. अमेरिकेतील ओहायो येथे हा प्रकार घडला होता. त्यानंतर संबंधित महिलेने कंपनीविरोधात न्यायालयात धाव घेतली होती. या प्रकरणी आता न्यायालयाने अंतिम निकाल देत महिलेला आर्थिक नुकसानभरपाई देण्याचे आदेश दिले आहेत.

मीडिया रिपोर्टनुसार, चेल्सी वॉल्श असे या महिलेचे नाव आहे. ती अमेरिकेतील ओहायो येथे राहते. २०२१ मध्ये ती गर्भवती होती आणि तिची प्रेग्नंसी 'हाय-रिस्क' होती. डॉक्टरांनी तिला पूर्ण विश्रांती घेण्याचा तसेच घरून काम (वर्क फ्रॉम होम) करण्याचा सल्ला दिला होता. त्यानुसार तिने




आपल्या वरिष्ठांकडे विनंती केली होती. चेल्सीने कंपनीकडे घरून काम करण्याची परवानगी मागितली होती; मात्र कंपनीने तिची ही मागणी फेटाळून लावली. तिला स्पष्टपणे सांगण्यात आले, की ऑफिसमध्ये येऊन काम करा किंवा विनावेतन रजा घ्या. त्यामुळे नाइलाजास्तव तिला ऑफिसला जावे लागले.

सलग तीन दिवस ऑफिसमधून काम केल्यानंतर २४ फेब्रुवारी रोजी संध्याकाळी तिला अचानक प्रसूती वेदना सुरू झाल्या. त्याच दिवशी तिने एका मुलीला जन्म दिला; मात्र दुर्दैवाने जन्मानंतर काही तासांतच त्या नवजात बाळाचा मृत्यू झाला. बाळ वेळेपूर्वी जन्माला आल्याने त्याची प्रकृती अत्यंत नाजूक होती. या घटनेनंतर चेल्सीच्या कुटुंबीयांनी कंपनीविरोधात न्यायालयात खटला दाखल केला. कंपनीने वेळेवर घरून काम करण्याची परवानगी दिली असती, तर ही घटना टळू शकली असती, असा युक्तिवाद त्यांनी न्यायालयात मांडला. न्यायालयीन सुनावणीनंतर ज्यूरीने कंपनीला दोषी ठरवले. तसेच न्यायालयाने महिलेला २२.५ मिलियन डॉलर्स इतकी नुकसानभरपाई देण्याचे आदेश दिले आहेत.

## ४७ लाख रुपयांची नोकरी सोडली

एका टेक्नॉलॉजी क्षेत्रातील व्यावसायिकाने ४७ लाख रुपये वार्षिक (एलपीए) इतक्या आकर्षक नोकरीच्या ऑफरला नकार दिल्याची बातमी सध्या 'सोशल मीडिया'वर मोठ्या प्रमाणात चर्चेत आहे. लोक मोठ्या पगाराच्या नोकरीसाठी सर्वतोपरी प्रयत्न करतात, तिथे वनेश माळी यांनी घेतलेल्या निर्णयाने अनेकांना विचार करायला भाग पाडले आहे. वनेश माळी यांना पुण्यातील एका कंपनीत वरिष्ठ पदासाठी ४७ लाख रुपये पगाराचे ऑफर लेटर मिळाले होते.

ही ऑफर केवळ पगाराच्या दृष्टीनेच उत्कृष्ट नव्हती, तर त्या कंपनीची प्रतिष्ठाही चांगली असल्याचे सांगितले जात होते. तरीही वनेश यांनी ही संधी स्वीकारली नाही. त्यांनी स्वतः पुढे येऊन सांगितले, की हा निर्णय त्यांनी अतिशय विचारपूर्वक घेतला आहे. त्यांच्या मते, केवळ जास्त पगार हे नोकरी स्वीकारण्याचे एकमेव कारण असू शकत नाही. त्यांनी स्पष्ट केले, की ते अद्याप त्या भूमिकेसाठी पूर्णपणे तयार नाहीत. त्यांच्या म्हणण्यानुसार, त्या पदासाठी आवश्यक असलेली कौशल्ये आणि अनुभवाच्या पातळीपर्यंत ते अद्याप पोहोचलेले नाहीत.




वनेश यांनी हेही स्पष्ट केले, की मोठ्या पगारासोबत मोठ्या जबाबदाऱ्या येतात. एखाद्या व्यक्तीला इतका मोठा पगार दिला जातो, तेव्हा कंपनीच्या अपेक्षाही त्यानुसार वाढतात. अशा परिस्थितीत कर्मचाऱ्यावर उत्कृष्ट कामगिरी करण्याचा दबाव असतो. त्यांनी सांगितले, की अशा पदांमध्ये शिकण्यासाठी वेळ खूप मर्यादित असतो, कारण कंपनीची अपेक्षा असते, की तुम्ही सुरुवातीपासूनच परिणाम द्यायला सुरुवात करावी. त्यांनी यावरही भर दिला, की जर एखादी व्यक्ती स्वतःला त्या भूमिकेसाठी तयार समजत नसेल आणि तरीही ती नोकरी स्वीकारत असेल, तर ते केवळ त्या व्यक्तीसाठीच नव्हे, तर कंपनीसाठीही धोकादायक ठरू शकते. अपेक्षांनुसार कामगिरी न झाल्यास त्याचा परिणाम दोन्ही बाजूंवर होतो. याच विचारामुळे त्यांनी ही ऑफर नाकारली.

## ... म्हणून पत्नीने सोडले घर!



देशात सध्या गॅस सिलिंडरची टंचाई आहे. अनेक ठिकाणी गॅस एजन्सीबाहेर रांगा लागल्या आहेत. काही लोकांना गॅस मिळत नाही. यातूनच काही वादाच्या घटना समोर येत आहेत. उत्तर प्रदेशातील बाराबंकी जिल्ह्यात एक दुःखद घटना घडली आहे.


निंदुरा येथील घुंघाटेर पोलिस ठाण्याच्या हद्दीतील बौधनी मझरे खटौली गावात राहणाऱ्या अनिल कुमारची पत्नी सुमन देवीने घर सोडले. फक्त एक हजार रुपयांच्या छोट्या वादातून ही घटना घडली. दोन वर्षांपूर्वी लग्न झालेल्या या जोडप्याला ५ महिन्यांचा मुलगा आहे. अनिल दुचाकी कंपनीत काम करतो. सोमवारी सकाळी आठ वाजता अनिल रात्रीची ड्यूटी संपवून घरी आला. त्याने जेवण मागितले; पण सुमन देवीने चुलीवर जेवण बनवण्यास नकार दिला. ती म्हणाली, की मी आता चुलीवर अन्न शिजवणार नाही, गॅस सिलिंडर भरून आणा; पण अनिलने सिलिंडर भरून आणण्यास नकार दिला. यावरुन दोघांचे भांडण झाले. अनिल रागाने झोपायला गेला.

अनिल झोपलेला असताना सुमनने कपडे बांधले. घरातील एक हजार रुपये घेतले आणि पाच महिन्याच्या मुलाला घेऊन घर सोडले. अनिल साडेचारच्या सुमारास जागा झाला, तेव्हा बायको आणि मुलगा दोघेही गायब असल्याचे त्याच्या लक्षात आले. सुमनने काहीही सांगितले नाही, फक्त सामान आणि मुलाला घेऊन निघून गेली.

अनिल तीन दिवस सतत त्यांचा शोध घेत होता. तो नातेवाइकांच्या घरी गेला. मोहम्मदपूर खाला, तेढावन, आसगिनगर, उस्मानपूर आणि सीतापूरच्या बनेहरा भागात फिरला; पण कुठेही त्याची पत्नी आणि मुलगा सापडले नाहीत. शेवटी अनिलने घुंघाटेर पोलिस ठाण्यात जाऊन पत्नी आणि मुलगा हरवल्याची तक्रार दिली. पोलिसांनी तात्काळ गायब झाल्याची नोंद केली.

अनिल म्हणाला, 'ती चूक माफ कर आणि घरी परत ये. मुलासाठी आणि कुटुंबासाठी ये.' पोलिसही सुमनला शोधण्यासाठी प्रयत्न करत आहेत. छोट्या गोष्टींमुळे मोठी समस्या निर्माण होऊ शकते हे या घटनेतून दिसते.

## पाण्याखालचं मिलिट्री संग्रहालय



सैन्याचे रणगाडे, तोफा, बंदुका अशा वस्तू समुद्राच्या तळाशी पहायला मिळाल्या तर... खूप गंमत येईल ना? जॉर्डनमध्ये असंच एक संग्रहालय तयार करण्यात आलं आहे. या संग्रहालयात सैन्याचे रणगाडे, हेलिकॉप्टर, बंदुका, बोटी पहायला मिळतात. विशेष म्हणजे हे संग्रहालय समुद्राच्या तळाशी आहे. त्यात तुम्हाला सैन्याची १९ उपकरणं पहायला मिळतील. अकाबा किनाऱ्यावरून हे संग्रहालय पहायला जाता येईल. लाल समुद्रात २८ मीटर म्हणजे ९२ फूट खोल ते उभारण्यात आलं आहे. फक्त सात दिवसात ते उभारण्यात आलं. इथे येणाऱ्या पर्यटकांना काही तरी धाडसी, वेगळं पाहिल्याचं समाधान मिळावं, समुद्री जीवनासोबतच सैन्याचं वैभव न्याहाळता यावं या उद्देशाने हे संग्रहालय उभारण्यात आलं. हे जगातलं पाण्याखालचं पहिलं मिलिट्री संग्रहालय आहे. पर्यटकांना तिथेपर्यंत पोहोचवण्यासाठी खास बोटी तयार करण्यात आल्या आहेत. खोल पाण्यात जायचं नसेल तर पर्यटक वरूनच हा नजारा बघू शकतात. यासाठी काचेच्या बोटी तयार आहेत. या बोटींमधून समुद्र तळ न्याहाळता येईल. असं हे अनोखं संग्रहालय जॉर्डनची शान वाढवणारं आहे.

## जुने ते सोने



सर्वसाधारणपणे कोणी जुने बूट खरेदी करत नाही. असे बूट, पादत्राणं टाकून दिली जातात. मात्र पादत्राणं तयार करणाऱ्या एका प्रसिद्ध कंपनीचे ४७ वर्षांपूर्वीचे बूट कोट्यवधी रुपयांना विकले गेले आहेत. या बुटांचा लिलाव करण्यात आला त्यावेळी भारतीय चलनात तीन कोटी रुपये एवढी किंमत मिळाली. काही काळापूर्वी 'नायके' या कंपनीची सर्वात दुर्मीळ बुटांची जोडी तीन कोटी रुपयांना विकली गेली. तेव्हा हा लिलाव चर्चेचा विषय ठरला होता. असं काय होतं या बुटांमध्ये, असा प्रश्न तुमच्या मनात उपस्थित झाला असेल. आजवर जुन्या बुटांना कधीच एवढी किंमत मिळाली नव्हती. याआधी महान बास्केटबॉलपटू मायकल जॉर्डनच्या बुटांवर १.३ कोटी रुपयांची बोली लागली होती. त्यानंतर नायके कंपनीच्या या बुटांसाठी एवढी बोली लावली गेली. हे बूट कंपनीने ४७ वर्षांपूर्वी तयार केले होते. ऑलिंपिक चाचणीच्या उद्देशाने त्यांची निर्मिती करण्यात आली होती. 'मून शूज' या नावाने ते ओळखले जायचे. न्यूयॉर्कमधल्या सोदबी ऑक्शन हाऊसमध्ये हा लिलाव संपन्न झाल्याचे आजही अनेकांना आठवत असेल. झाला. बिल बॉवर्नमॅन यांनी हे बूट डिझाइन केले होते. या लिलावात बुटांच्या १०० जोड्यांसाठी भारतीय चलनात ५.५६ कोटी रुपयांची बोली लागली होती.

## अनोखा संवाद



प्राणी-पक्षी एकमेकांशी संवाद साधतात. धोक्याच्या सूचना देतात. एकमेकांच्या मदतीसाठी धावूनही येतात. पण त्यांच्या अंड्यांचं काय? अंडीही एकमेकांशी संवाद साधतात का? या प्रश्नाचं उत्तर 'हो' असं द्यावं लागेल. अंडीही एकमेकांशी संवाद साधतात. स्पेनमधल्या विगो विद्यापीठातल्या एका संशोधनातून ही धक्कादायक बाब समोर आली. संशोधकांनी पिवळ्या पायांच्या चिमणीच्या ९० अंड्यांवर संशोधन केलं. त्यावेळी आईने धोक्याची सूचना दिल्यावर अंड्यांमध्ये कंपनं जाणवली. या कंपनांद्वारे अंडी इतर अंड्यांना सावध करतात. कंपनांमुळे शेजारचं अंडं सावध होतं. त्याला धोक्याची जाणीव होते. अंड्यांच्या आत असणारी पिल्लं धोक्याची सूचना मिळताच तीव्र हालचाली करू लागतात, आवाज काढू लागतात. या आवाजामुळे अंड्यांमध्ये कंपनं जाणवतात. कंपनांच्या माध्यमातून अंडी एकमेकांशी संवाद साधतात. या सूक्ष्म निरीक्षणावरुन पक्ष्यांची अंडी एकमेकांशी संवाद साधत असल्याची बाब अधोरेखित होत असल्याचं शास्त्रज्ञांचं म्हणणं आहे.



हिंद सेवा मंडळाची प्राथमिक शाळा, बागडपट्टी विभागाचे इयत्ता चौथीतील ७ विद्यार्थी डॉ. हेगडेवार शिक्षण प्रतिष्ठाण आयोजित अहिल्यानगर प्रज्ञाशोध परिक्षेत जिल्हास्तर गुणवत्ता यादीत चमकले.

# डॉ. हेगडेवार शिक्षण प्रतिष्ठान आयोजित प्रज्ञाशोध परिक्षेत हिंदसेवा मंडळाच्या प्राथमिक शाळेचे सात विद्यार्थी चमकले

## चिन्मय म्हस्के जिल्ह्यात दुसरा

नगर – हिंद सेवा मंडळाची प्राथमिक शाळा, बागडपट्टी विभागाचे इयत्ता चौथीतील ७ विद्यार्थी डॉ. हेगडेवार शिक्षण प्रतिष्ठाण आयोजित अहिल्यानगर प्रज्ञाशोध परिक्षेत जिल्हास्तर गुणवत्ता यादीत चमकले. शाळेतील इयत्ता चौथी मधील चिन्मय म्हस्के हा २८० गुण मिळवत जिल्ह्यात दुसरा आला. त्याचप्रमाणे अर्णवी कांबळे –जिल्ह्यात आठवी, अदिती खेडकर–जिल्ह्यात नववी, राजकुमार निसाद–जिल्ह्यात दहावा, जिविका ताकपेरे–जिल्ह्यात चौदावी, असद शेख–जिल्ह्यात सतरावा व सीमरा शेख–जिल्ह्यात सतरावी आली.

दरवर्षी स्पर्धा परीक्षेसाठी शाळेतील विद्यार्थ्यांची तयारी करून घेतली जाते. यासाठी शाळेचे मुख्याध्यापक विठ्ठल उरमुडे तसेच सर्व शिक्षक परिश्रम घेत असतात. विद्यार्थ्यांनी प्राथमिक शाळेपासूनच स्पर्धा परीक्षेची तयारी करुन भविष्यात उज्वल या संपादन करावे. मागील २५ वर्षापासून अहिल्यानगर प्रज्ञाशोध परीक्षेत शाळेचे विद्यार्थी सातत्यपूर्ण गुणवत्ता यादीत चमकत आहेत. याचा आम्हास नक्कीच अभिमान आहे. स्पर्धा परीक्षेतील यशस्वी विद्यार्थ्यांमुळे शाळेच्या नवलौकिकात भर पडत आहे, असे गौरोद्गार शाळेचे चेअरमन मधुसूदन सारडा यानी काढले.

विद्यार्थांना शाळेतील शिक्षिका सौ.मनिषा साळी व मुदस्सिर पठाण यांनी मार्गदर्शन केले.

गुणवंत विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शक शिक्षकांचे अभिनंदन शाळेचे चेअरमन मधुसूदन सारडा, संस्थचे अध्यक्ष शिरीष मोडक, मानद सचिव संजय जोशी, कार्याध्यक्ष सुमतीलाल कोठारी तसेच शाळेचे मुख्याध्यापक विठ्ठल उरमुडे आदींनी केले आहे.

# अहिल्यानगर जिल्ह्यात १४ एप्रिल पर्यंत सामाजिक समता सप्ताह साजरा होणार

नगर – जिल्ह्यात ८ ते १४ एप्रिल या कालावधीत 'भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता सप्ताह' विविध प्रबोधनात्मक उपक्रमांनी साजरा करण्यात येणार आहे. सप्ताहादरम्यान दररोज समाजोपयोगी कार्यक्रम राबविण्यात येणार असून नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन समाजकल्याण विभागाचे सहायक आयुक्त प्रवीण कोरगंटीवार यांनी केले आहे.

भारतीय संविधानाच्या ७५ वर्षपूर्तीनिमित्त, महाड येथील चवदार तळे सत्याग्रहाच्या शताब्दी वर्षानिमित्त, तसेच महात्मा ज्योतिबा फुले यांच्या द्विशताब्दी जयंती वर्ष व संत गाडगे महाराज यांच्या १५० व्या जयंती वर्षाचे औचित्य साधून या सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे.

सप्ताहाच्या पहिल्या दिवशी, ८ एप्रिल रोजी भारतीय संविधानाच्या प्रस्तावनेची प्रत प्रत्येक कुटुंबास वितरित करण्यात येणार असून सप्ताहाचे उद्घाटन करण्यात येईल.

९ एप्रिल रोजी जिल्ह्यातील महाविद्यालये, शासकीय वसतिगृहे व निवासी शाळांमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांवर, महाड चवदार तळे सत्याग्रहावर तसेच मानवी हक्कांवर व्याख्याने आयोजित करण्यात येतील. यासोबतच संत गाडगे महाराज यांच्या कार्यावर आधारित वक्तृत्व, निबंध व लघुनाट्य स्पर्धांचे आयोजन केले जाईल. याच दिवशी प्रातिनिधिक स्वरूपात लाभार्थ्यांना विविध शासकीय योजनांचा लाभ देण्यात येईल.

१० एप्रिल रोजी समतादूतांच्या माध्यमातून ग्रामीण व शहरी भागात पथनाट्याद्वारे सामाजिक न्याय विभागाच्या योजनांची माहिती देण्यात येणार आहे. तसेच 'मार्जिन मनी' योजनेच्या लाभार्थ्यांसाठी विशेष कार्यशाळा आयोजित करण्यात येईल.

महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त ११ एप्रिल रोजी जिल्ह्यात विविध स्तरांवर त्यांच्या सामाजिक कार्याचा जागर करणारे कार्यक्रम होणार आहेत.

१२ एप्रिल रोजी 'संविधान जागर' उपक्रमांतर्गत संविधान निर्मिती, मूलभूत अधिकार व कर्तव्ये यावर व्याख्याने आयोजित करण्यात येतील. तसेच महिला मेळाव्याच्या माध्यमातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी महिलांसाठी केलेल्या कार्याची माहिती दिली जाईल.

१३ एप्रिल रोजी ज्येष्ठ नागरिकांसाठी प्रबोधन शिबिर, विद्यार्थ्यांसाठी रक्तदान शिबिर, तसेच वस्त्यांमध्ये स्वच्छता अभियान राबविण्यात येईल. याच दिवशी जात पडताळणी कार्यालयामार्फत ऑनलाइन वैधता प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात येणार आहे.

सप्ताहाच्या समारोपाच्या दिवशी, १४ एप्रिल रोजी सर्व शासकीय कार्यालयांमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यात येईल. यानिमित्त शेतकऱ्यांसाठी दादासाहेब गायकवाड सबलीकरण मेळावा, तसेच महाड चवदार तळे सत्याग्रहावर व्याख्याने आयोजित करण्यात येऊन सप्ताहाचा समारोप होईल.

# नगर येथील मृदुला मुनोत हिला गोल्ड मेडलसह एमबीबीएस पदवी

नगर – श्रीमती बी.के. शाहा मेडिकल इन्स्टिट्यूट अ‍ॅण्ड



रिसर्च सेंटर, सुमन दीप विद्यापीठ, बडोदा यांच्यातर्फे येथील मृदुल सीमा राहुल मुनोत हिला एमबीबीएस साठी गोल्ड मेडल मिळाले आहे. एमबीबीएसच्या सलग चारही वर्षात ती कॉलेजमध्ये सर्वप्रथम आली. बडोदा येथे सोहळ्यामध्ये पदवीदान समारंभ पार पडला.

मृदुल हिने इयत्ता दहावीपर्यंतचे शिक्षण नगरमधील सेंट मायकल शाळेमधून घेतले. अकरावी आणि बारावीचे शिक्षण रामकृष्ण कॉलेजमधून पूर्ण केले. शाळेत असताना तिने अनेक स्पर्धांमध्ये बक्षीस मिळवले. ती बास्केटबॉल आणि बॅडमिंटनची राज्यस्तरीय खेळाडू आहे. विविध एकांकिका, पथनाट्य, वक्तृत्व अशा अनेक स्पर्धांमध्ये तिने यश मिळवले पारितोषिके मिळवली आहेत. सेंट मायकल शाळेची ती आदर्श विद्यार्थिनी घोषित झाली होती. रामकृष्ण कॉलेजमध्ये बारावीला ती प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाली. शिक्षणाबरोबर संस्कारांची जपवणूक सुद्धा तिने केलेली आहे.

# अहिल्यानगरचा कबड्डी संघ ठरला राज्य अजिंक्यपद स्पर्धेचा विजेता

## ५ वेळा अंतिम सामन्यात खेळण्याचा रचला इतिहास




नगर – राज्य निवड चाचणी व अजिंक्यपद पुरुष कबड्डी स्पर्धेत अहिल्यानगरच्या संघाने स्पर्धेतील पहिल्या सामन्यापासून आपला दबदबा दाखवत अजिंक्यपदाच्या ट्रॉफीवर आपले नाव कोरले आहे. संघाने पाच वेळा अंतिम सामन्यात खेळण्याचा इतिहास रचला आहे.

राज्य अजिंक्यपद कबड्डी स्पर्धेत अहिल्यानगर संघाला सलग तीनदा अजिंक्यपदाची हुलकावणी दिली होती. त्यामुळे संघाला यावेळेची संधी हुकू द्यायची नव्हती, म्हणून यंदाचा संघ संतुलीत निवडण्यात आला होता. यंदा अजिंक्यपदाला गवसणी घालणार असा विश्वास घेऊन संघ रवाना झाला होता.

सिन्नर (नाशिक) येथे २ ते ६ दरम्यान आयोजित ७३ व्या राज्य निवड चाचणी व अजिंक्यपद स्पर्धेत नगरच्या संघाने साखळी सामन्यात गटातील सर्व सामने जिंकत बाद फेरीत प्रवेश मिळवला होता. बाद फेरीत ठाणे, रायगडला हरवून अंतिम सामन्यात धडक मारली होती. संघाकडून डावी चढाईपटू आदित्य शिंदे, शिवम पटारे, उजवा कोपरा रक्षक शंकर गदई, डावा मध्य रक्षक अजित पवार यांनी चांगला खेळ करत संघाला विजय मिळवून दिले.

उपांत्यपूर्व फेरीत नगरच्या संघाने ठाणे संघाचा ६०–२६ गुणांनी पराभव करत सामना जिंकला. उपांत्य सामन्यात रायगड बरोबर झालेल्या सामन्यात ५३–२७ गुणांच्या फरकाने सामना जिंकत थाटात अंतिम सामन्यात प्रवेश केला होता. अंमित सामन्यात कोल्हापूरचा संघ समोर उभा ठाकला होता. पाचव्यांदा अंतिम फेरीत खेळणाऱ्या नगरच्या संघाकडे अनुभवी खेळाडूंची साथ होती. अंतिम सामन्यात पहिल्या चढाईपासून नगर संघाने दबदबा निर्माण केला होता. नगर संघाने ४४–३३ गुणांच्या फरकाने सामना जिंकत अजिंक्यपद पटकाविले आहे.

माजी क्रीडा अधिकारी अजय पवार, प्रशिक्षक शंतनू पांडव यांचे संघाला मार्गदर्शन लाभले. या विजेत्या संघाचे अहिल्यानगर जिल्हा कबड्डी संघटनेचे सचिव प्रा. शशिकांत गाडे, विजयसिंह मिस्किन, जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरंगे, खजिनदार प्रकाश बोरुडे, उद्योजक संतोष घोरपडे, विनायक भुतकर, अजय पवार, सचिन सप्रे, कृष्णा लांडे आदींनी अभिनंदन केले.



वर्धमान महावीर कॉलेज ऑफ नर्सिंग व आनंदऋषीजी नर्सिंग इन्स्टिट्यूट यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक आरोग्य दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

# वर्धमान महावीर कॉलेज ऑफ नर्सिंगमध्ये जागतिक आरोग्य दिन उत्साहात साजरा

नगर – कल्याण रोड येथील वर्धमान महावीर कॉलेज ऑफ नर्सिंग व आनंदऋषीजी नर्सिंग इन्स्टिट्यूट यांच्या संयुक्त विद्यमाने Together for Health - Stand with Science या संकल्पनेवर आधारित जागतिक आरोग्य दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमासाठी वर्धमान महावीर कॉलेज ऑफ नर्सिंग चे संचालक सुनील मालू यांनी मार्गदर्शन केले. त्यांच्या प्रेरणादायी मार्गदर्शनाने विद्यार्थ्यांमध्ये आरोग्याविषयी जागरूकता निर्माण झाली. तसेच विज्ञानाधिष्ठित आरोग्यसेवेचे महत्त्व अधोरेखित झाले.

या निमित्ताने रांगोळी, पोस्टर व मॉडेल बनवा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत सर्जनशीलता व वैज्ञानिक दृष्टिकोन प्रभावीपणे मांडला.

या कार्यक्रमाची यशस्वी अंमलबजावणी व उत्कृष्ट नियोजन प्राचार्य डॉ. विद्या ठोकळ यांच्या कुशल नेतृत्वाखाली करण्यात आले. यावेळी नर्सिंग कॉलेज चे स्वाती सूर्यवंशी, चित्रा नेरुरकर, एंजल साळवे, शर्लिन माडगुळे, प्रियांका वारे, एस्थर टेलडुने व अश्विनी पाटोळे तसेच इतर सर्व विभाग सदस्य आदींनी सहकार्य केले. सर्व स्पर्धांचे परीक्षण समता छाजेड यांनी केले.

# तिहेरी आत्महत्या प्रकरणात आरोपीला शिरुर न्यायालयाकडून जामीन मंजूर

नगर – पत्नीने आपला मुलगा व मुलीसह विहिरीत उडी घेऊन आत्महत्या केल्याच्या प्रकरणी पती राजू पांडुरंग जाधव यांच्याविरुद्ध शिक्रापूर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला होता. सदर गुन्हा मयत महिलेच्या बहिणीच्या फिर्यादीवरून दाखल करण्यात आला होता. या प्रकरणातील आरोपी राजू जाधव यांना शिरुर न्यायालयाने जामीन मंजूर केला असल्याची माहिती अ‍ॅड. सचिन पाठक यांनी दिली.

याबाबत माहिती अशी की राजू पांडुरंग जाधव हे अहिल्यानगर शहरात राहत असून, त्यांच्या पत्नीने शिरुर येथे माहेरी जावून आत्महत्या केली होती. या प्रकरणात मयत महिलेच्या बहिणीने आरोपी राजू पांडुरंग जाधव यांच्याविरोधात शिरुर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली होती. या प्रकरणात आरोपीच्यावतीने अ‍ॅड. सचिन पाठक यांनी घोडनदी, ता. शिरूर येथील जिल्हा व सत्र न्यायालयात जामीन अर्ज दाखल केला. बचाव पक्षाने न्यायालयासमोर मांडलेल्या युक्तिवादात आरोपीविरुद्ध आत्महत्येस प्रवृत्त केल्याबाबत कोणताही ठोस व सबळ पुरावा उपलब्ध नसल्याचे नमूद केले.

तसेच, आत्महत्येपूर्वी आरोपीकडून वाद, मारहाण किंवा आत्महत्येस प्रवृत्त करणारे कृत्य झाल्याचेही सिद्ध झाले नसल्याचे सांगण्यात आले. पोलीस व सरकारी पक्षाकडून आरोपीचा गुन्ह्यातील थेट किंवा सक्रिय सहभाग सिद्ध करण्यात आलेला नाही, असा मुद्दा देखील मांडण्यात आला. दोन्ही बाजूंचा युक्तिवाद विचारात घेऊन जिल्हा व सत्र न्यायालयाने आरोपी राजू पांडुरंग जाधव यांचा जामीन अर्ज मंजूर केला, असल्याचे सांगण्यात आले.



आय डी टी एज्युकेशन संस्थेमार्फत इंटेरियर डिझायनर कु. श्रद्धा डोळसे व सौ. शुभदा देवकर यांना डिझाईन एक्सलन्स अवॉर्ड देऊन सन्मानित करताना मराठी अभिनेते चिन्मय उदगीरकर आदी.

# श्रद्धा डोळसे व शुभदा देवकर यांचा डिझाईन एक्सलन्स अवॉर्डने सन्मान

नगर – आय डी टी एज्युकेशन, नासिक या संस्थेमार्फत दशवार्षिक समारंभानिमित्ताने कार्यक्रमात इंटेरियर डिझायनर कु. श्रद्धा डोळसे व सौ. शुभदा देवकर या दोघी भगिनींना डिझाईन एक्सलन्स अवॉर्ड देऊन सन्मानित केले. मराठी अभिनेते चिन्मय उदगीरकर यांच्या हस्ते हा सन्मान श्रद्धाने केलेल्या सुंदर इंटेरियर डिझाइन्स व इंटेरियर या क्षेत्रात केलेल्या उत्कृष्ट कार्यसाठी तसेच सौ. शुभदा हिने फॅशन डिझायनिंग क्षेत्रात केलेल्या उत्कृष्ट कार्याबद्दल दोघींचा हा सन्मान या संस्थेने केला. याप्रसंगी आर्किटेक्ट, शिल्पकार व सिने सेट डिझायनर श्याम लोंढे, संस्थेचे संस्थापक प्रा. महेंद्र शेवाळे, सौ. स्नेहल शेवाळे उपस्थित आदी होते.

याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष लोंढे यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की सौंदर्य हे आपल्या विचारात आणि कृतीत असते त्याचाच उपयोग करून आपण केलेली डिझाईन, कलाकृती ही बोलत असते. आपली कलाकृती, डिझाईनेच त्या कलाकाराविषयी सांगायला हवे आणि उत्तम इंटरियर डिझायनर, फॅशन डिझायनर आपल्या डिझाइन्स मधूनच वेगळेपण दर्शवितात. त्यांची कलाकृती हीच त्यांचे व्यक्त होण्याचे माध्यम असते.

यावेळी अभिनेते उदगीरकर यांनी मार्गदर्शन करताना आधी स्वतः सौंदर्य समजून घ्यावे कारण आपले विचार आपली कृती हेच आपल्या निर्मितीमध्ये परावर्तित झालेली दिसते. त्यामुळे प्रथम स्वतःला कलात्मक आणि सकारात्मक संदेश देत राहा. अभ्यासातील सातत्य आणि नाविन्याचा शोध यातून नक्कीच उत्तम निर्मिती होते.

यावेळी संस्थापक प्रा. शेवाळे यांनी विद्यार्थ्यांना आपल्या आवडीच्या क्षेत्रात करिअर केल्यामुळे आपले आयुष्य देखील आनंदी होते हे सांगितले.

रेडिसन ब्लू हॉटेल मध्ये झालेल्या या कार्यक्रमात हा सन्मान करण्यात आला. या सन्मानाबद्दल प्रा. शिरीष मोडक, संजय जोशी, ब्रिजलाल सारडा, अजित बोरा, श्यामसुंदर सारडा, अ‍ॅड. दीपक शर्मा, लक्ष्मण देवकर, ज्ञानेश्वर काळे,अमोल खोले, सचिन हिवाळे, हरिभाऊ डोळसे, सोमनाथ देवकर, गौरव भन्साळी, रवींद्र वाघमारे, नंदकुमार देशपांडे, राजेंद्र टाक आदींनी अभिनंदन केले.

# बाबुर्डी बेंद येथे १० व ११ एप्रिलला खंडोबा यात्रा उत्सवाचे आयोजन

नगर – नगर तालुक्यातील



बाबुर्डी बेंद येथे खंडोबा यात्रेनिमित्ताने दोन दिवस विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. पंचक्रोशीतील भाविकांनी कार्यक्रमंचा लाभ घ्यावा असे आवाहन बाबुर्डी बेंद ग्रामस्थांच्यावतीने करण्यात आले आहे.

सालाबादप्रमाणे कालाष्टमीला १० एप्रिल रोजी खंडोबा यात्रा उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. यात्रेनिमित्ताने भाविक जेजुरी येथील कऱ्हा नदी पात्रातून कावडीने पाणी आणतात. १० एप्रिल रोजी सकाळी कावडधारकांचे स्वागत करण्यात येणार आहे. कावडधारक सकाळी आठ वाजता देवाला पाणी घालतील. सायंकाळी सात वाजता महाआरती होईल. त्यानंतर काठी मिरवणूक काढण्यात येणार आहे. रात्री जागरण गोंधळ कार्यक्रम होईल.

११ एप्रिल रोजी ऑर्केस्ट्राचे आयोजन करण्यात आले आहे. यात्रेनिमित्त होणाऱ्या विविध कार्यक्रमांचा पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी लाभ घ्यावा असे आवाहन बाबुर्डी बेंद ग्रामस्थांच्यावतीने करण्यात आले आहे.

# 'अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषद' अहिल्यानगर जिल्हा दक्षिण कार्यकारणी जाहीर



अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषद अहिल्यानगर दक्षिण कार्यकारणी जाहीर करण्यात आली. यावेळी जिल्हाध्यक्ष सुभाष लोंढे, कार्याध्यक्ष अर्जुन मेहेत्रे (जामखेड), महिला अध्यक्ष संगीता ढवळे (शेवगाव) आदींसह सर्व पदाधिकारी

नगर – ११ एप्रिल रोजी होणाऱ्या क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले जयंतीचे तसेच द्विशताब्दी वर्षानिमित्त घ्यावयाच्या कार्यक्रमा संदर्भात नियोजन आणि नवनियुक्त जिल्हा कार्यकारणी पदाधिकारी यांना नियुक्ती पत्र देण्यात आले. याबाबत अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेची जिल्हा कार्यकारणी बैठक जिल्हाध्यक्ष सुभाष लोंढे यांच्या अध्यक्षतेखाली झाली.

यावेळी बोलताना जिल्हाध्यक्ष सुभाष लोंढे म्हणाले कि थोर समाज सुधारक महात्मा फुले जयंती सर्व तालुक्यात समता परिषदेच्या बॅनरखाली साजरी करण्याचे ठरले. तसेच द्विशताब्दी वर्षानिमित्त ११ एप्रिल पासून वर्षभर जिल्हात कार्यक्रम घेण्यात येतील. महात्मा फुले समता परिषदेच्या प्रत्येक तालुक्यात नवीन शाखा उघडण्याचे यावेळी ठरविण्यात आले. यावेळी जिल्हा कार्यकारिणी सदस्यांना यावेळी नियक्ती पत्र देण्यात आली.

महात्मा फुले समता परिषद अहिल्यानगर दक्षिण जिल्हाध्यक्षपदी सुभाष लोंढे यांची फेरनिवड केल्याबद्दल महात्मा फुले समता परिषद संस्थापक अध्यक्ष छगनराव भुजबळ, माजी खासदार समीर भुजबळ, आमदार पंकज भुजबळ यांचे आभार मानले.

सुभाष लोंढे यांची जिल्हाध्यक्षपदी नियुक्ती झाल्याबद्दल, ओबीसी महामंडळाचे मा. अध्यक्ष बापूसाहेब भुजबळ, माजी आमदार पांडुरंग अभंग, मा. जि. प. सदस्य अण्णासाहेब शेलार, महात्मा फुले समता परिषद प्रदेश चिटणीस अंबादास गारुडकर, जिल्हा परिषद सदस्य शरद झोडगे, प्रदेश प्रवक्ते डॉ. नागेश गवळी, नगरसेवक बाळासाहेब बोराटे, भगवान फुलसौंदर, नगरसेवक रमेश गोरे, विभागीय अध्यक्ष मच्छिंद्र गुलदगड, प्रदेश चिटणीस अनिल निकम, किसनराव रासकर, सुवर्णा धाडगे यांनी अभिनंदन केले.

यावेळी जिल्हाध्यक्ष सुभाष लोंढे, कार्याध्यक्ष अर्जुन मेहेत्रे (जामखेड), महिला अध्यक्ष संगीता ढवळे (शेवगाव), तालुकाध्यक्ष नवनाथ खामकर (पारनेर), सोमनाथ धाडगे (नगर), संभाजी गदादे (कर्जत), नागनाथ वाळके (पाथर्डी), सुनील शिंदे, (जामखेड), सुरेश थोरात, (शेवगाव), तसेच नवनाथ शिंदे (उपाध्यक्ष), सय्यद अन्सार (उपाध्यक्ष), रामदास नगरे, अनिल चौधरी, कृष्णा पांचाळ, आकाश वाघ, भरत गारुडकर, वसंत रांधवन, बबन घुमटकर, महेश थोरात, किरण नगरे, सय्यद आरिफ, तन्मय खामकर, हर्षद खामकर, अविनाश लोखंडे, बबन चौरे, विश्वनाथ राऊत, राजेंद्र शेलार, युवराज हजारे, रामदास नगरे, किरण वाघ, राणीताई जाधव आदी उपस्थित होते. प्रसाद भडके यांनी आभार मानले.

